# स्वरूपयोग



एप्रिल २०१८
वर्ष एकविसावे, अंक पहिला
मूल्य ₹ २५


## ‘समाजशिक्षक’ पुरस्कार वितरण सोहळा



कै. अण्णा तळवलकर




श्री. श्री. द. महाजन यांच्या हस्ते
‘समाजशिक्षक’ पुरस्कार स्वीकारताना स्वामी





## गुढीपाडव्यानिमित्त विशेष कार्यक्रम





# स्वरूपयोग

## वार्तापत्र

**वर्ष २१, अंक १, एप्रिल-मे-जून २०१८**

मूल्य ₹२५, वार्षिक वर्गणी ₹१००

आजीवन सभासदत्व ₹२,५००

परदेशी सभासदांसाठी US $ 25, Life Membership US $ 375

**● प्रकाशक व प्रेषक : स्वरूपयोग प्रतिष्ठान ●**

**● संपादिका ●**

सौ. आशा माधव नगरकर

**● सहसंपादिका ●**

सौ. रोहिणी मांडवगणे

**● अक्षरजुळणी ●**

स्वरूपयोग साधक परिवार



**● स्वरूपयोग प्रतिष्ठान ●**

**द्वारा : सौ. आशा माधव नगरकर**

**८८५/३ शिवाजीनगर, भांडारकर रोड,**

**गल्ली क्र. ६, पुणे ४११ ००४, महाराष्ट्र (भारत)**

**फोन : ९१-२०-२५६५२४५७**

**(कार्यालयीन वेळ - रविवार सोडून सकाळी ११ ते दुपारी ४)**

**अन्य वेळांसाठी फोन :२५४४१०३६/८२७५१४५२५१**

E-mail : swaroopyog@gmail.com

For Vartapatra : swaroopyogvp@gmail.com

Website : www.swaroopyog.net



**● मुद्रक : बालोद्यान प्रेस ●**

**१३५८ अ, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२**

E-mail : balodyanpress@gmail.com

**'स्वरूपयोग' वार्तापत्र मालकीसंबंधी**

दि रजिस्ट्रेशन ॲक्ट ऑफ न्यूजपेपर्स (सेंट्रल) रूल्स १९५६ नियम क्रमांक ८ अन्वये निवेदन फॉर्म नं. ४

१. **प्रकाशन स्थळ** - स्वरूपयोग प्रतिष्ठान, ८८५/३, शिवाजीनगर, भांडारकर रोड, गल्ली क्र. ६, पुणे ४

२. **प्रकाशन काल** - त्रैमासिक

३. **मुद्रक, प्रकाशक व संपादक** - स्वरूपयोग प्रतिष्ठान, पुणे
सौ. आशा माधव नगरकर, **राष्ट्रीयत्व** - भारतीय

४. **प्रकाशनाची मालकी** - स्वरूपयोग प्रतिष्ठान
डॉ. माधव बाळकृष्ण नगरकर, ८८५/३, शिवाजीनगर, भांडारकर रोड, गल्ली क्र. ६, पुणे ४

५. **रजिस्टर क्रमांक - ई/२५६०/पुणे**

मी, सौ. आशा माधव नगरकर असे घोषित करते, की वर दिलेला तपशील माझ्या समजुतीप्रमाणे व माहितीप्रमाणे बरोबर आहे.

**दि. ३१ मार्च २०१८** **सौ. आशा माधव नगरकर (संपादिका)**

स्वरूपयोग प्रतिष्ठान, पुणे करिता - प्रकाशक


## ● अनुक्रमणिका ●


- **स्वा. सावरकरांची आगळी अध्यात्मपर काव्ये** २
- **सरस रामायण** ५
  (किष्किंधाकाण्ड, लेखांक ७)
- **श्रीमत् दासबोध स्वाध्याय** ८
  (नामस्मरणभक्ती, द. ४, स. ३, लेखांक ३)
- **श्रीमत् भागवत स्कंध ४ व ५** ११
- **'समाजशिक्षक' पुरस्कार सोहळा वृत्त** १३
- **युवा-विश्व**
  - **'ध्यान' चिंतन** - सौमित्र पंडित १४
  - **१८५७चे स्वातंत्र्यसमर** - शिल्पा भालेराव १७
  - **१८५७चे स्वातंत्र्यसमर - शिल्पा भालेरावच्या स्वाध्यायावर स्वामींचे मत प्रकटन**
    शब्दांकन- आशा नगरकर २०
- **अभिनंदन** - *आशुतोष पुरोहित* ९
  - *तन्वी इंगळे* १२
  - *रसिका वझे* १६
  - *रम्या पटेल* १९
  - *कीर्ती कुमठेकर* २२
  - *श्रद्धा जोशी* २३
- **अभिप्राय** - डॉ. पुष्पा आगाशे पत्र २४
- egranthalay.com २४


### मुखपृष्ठ

**बर्फाच्छादित निसर्ग, सिमला**

**छायाचित्र - स्वामी माधवानंदांच्या कॅमेऱ्यातून**


- **या मासिकातील नामनिर्देश केलेले लेख सोडून अन्य सर्व लेख स्वामी माधवानंद (डॉ. माधव बाळकृष्ण नगरकर) यांच्या प्रवचनांतून, सत्संगांमधून अथवा लेखनातून घेतलेले आहेत.**
- **या मासिकातील लेखनाचे सर्व हक्क संपादिकेच्या स्वाधीन आहेत.**
- **पुनर्प्रकाशनासाठी संपादिकेची लेखी परवानगी घेणे कायदेशीर रीत्या बंधनकारक आहे.**

# स्वा. सावरकरांची आगळी अध्यात्मपर काव्ये

सावरकरांच्या कित्येक काव्यांमधून अध्यात्मशास्त्राची तत्त्वे सहज प्रकट झाली आहेत, पण दोन काव्यं पूर्णपणे परम तत्त्वाचा वेध घेणारी आहेत. यांतल्या कल्पना एवढ्या भव्य आहेत, रचना एवढ्या नावीन्यपूर्ण नि आगळ्या-वेगळ्या आहेत, की या कवितांवरून त्यांना 'महाकवी' म्हणावं असं वाटतं. न.चिं.केळकरांनी तसं म्हटलंही आहे.

'सावरकर कविता' या पुस्तकातलं एक काव्य आहे- अज्ञेय, जे जाणलं जाऊ शकत नाही- परम तत्त्व- त्याच्याकडे जाण्याचा मी प्रयत्न करतो आहे पण त्याचं दार कायमचं लागलेलं आहे म्हणून '**अज्ञेयाचे रुद्धद्वार**' असं त्या कवितेचं नाव आहे. त्या कवितेत ते म्हणतात,

**ज्या घरापासुनि मार्ग सर्व फुटणारे।**

म्हणजे 'त्याच्या' (ईश्वराच्या) त्या घरापासूनच सर्व मार्ग निर्माण झालेले आहेत.

**येणार घरासी मार्ग त्याचि ते सारे।**

देवाच्या घरापासून सर्व मार्ग फुटलेले आहेत, आणि सर्व मार्ग देवाच्या घरापाशीच येतात. कुठूनही मार्ग सुरू केला तरी तो शेवटी तिथे येणार.

**ऐकोनी तुझ्या भाटांच्या, गप्पांसि गोड त्या त्यांच्या**
**घ्यायासि विसावा माझ्या जीवासि ये घरी तुमच्या**
**ठोठावित थकलो! अजुनि नुघडती बा रे ।।१।।**
**आंतूनि तुझी ती बंद सदोदित दारे**

कवी-संत वगैरे तुझे जे भाट आहेत, ते तुझ्याबद्दल छान छान बोलतात आणि आम्ही तुझ्या इथे आलो तर तुझी दारं आतून लावलेली, कायमची. ती दारं ठोठावून मी थकलो.

**विस्तीर्ण अनंता भूमी, कवणाही कुणाच्या धामी**
**ठोठावित बसण्याहूनी घेईन विसावा लव मी**

हे सगळं ठोठावत बसण्यापेक्षा लव म्हणजे क्षणभर मी विसावा तरी घेईन.

**येईन पुन्हा ना तुझ्या घरा ज्याची रे**
**ही वज्रकठिणशी बंद सदोदित दारे**

तुझ्या बंद घराला आता परत ठोठवायला येणार नाही.

**ज्या गाति कथा राजांच्या सोनेरि राजवाड्यांच्या**
**मा पथे पुराणज्ञांच्या जावया घरा त्या त्यांच्या**
**चाललो युगांच्या क्रोशशिला गणितां रे ।।२।।**

पुढच्या एका कवितेतही हीच कल्पना केलेली आहे. काळाचा रस्ता आहे आणि त्याच्यावर युगांचे दगड आहेत. मैलाचे दगड नाहीत. कारण हा काळाचा रस्ता आहे. त्या रस्त्यावरून मी चाललो आहे, तुझा माग काढत आणि सगळ्यांत शेवटी

**चाललो युगांच्या क्रोशशिला गणितां रे**

आता हे युग मागे पडलं, ते युग मागे पडलं, आता तरी तुझं घर सापडेल.

**तो पथा अंति घर एक तुझे ते सारे ।।३।।**

ती सगळी युगं तुझ्यापासून सुरू होतात. म्हणून या युगांच्या रस्त्याच्या शेवटी तुझं घर असणारच. सगळा काळच तुझ्यापासून सुरू होतो. म्हणून या सगळ्या युगांच्या उलटं उलटं गेलं तर तुझ्यापर्यंत येऊन पोहोचू. म्हणून मी तसं चाललो आहे.

हा एक मार्ग आहे. पण हा मार्ग फार लांबचा आहे आणि खूप वेळ खाणारा आहे. कारण कितीतरी युगं चालत जायला लागतं तुझ्यापर्यंत पोहोचायला. म्हणून मग दुसरा एक मार्ग राहिला. तो मार्ग कोणता आहे?

**दुंदुभी नगारे शृंगे गर्जती ध्वनींचे दंगे**
**क्रांतीचे वीर रणरंगे बेभान नाचती नंगे**
**मी जात मिळुनी त्यांत त्या पथे जो रे**
**अंतासि उभे घर तेचि तुझे सामोरे ।।४।।**

एक वेगळा मार्ग आहे तुझ्यापर्यंत पोहोचायचा. तो म्हणजे क्रांतिकारकांमध्ये सामील होऊन जायचं. नाचत नाचत मरणाकडे जायचं. आणि तोच मार्ग मला तुझ्याकडेच घेऊन येईल म्हणून मी या मार्गाने तुझ्याकडे यायचं ठरवलं.

**कोठूनि आणखी कोठे चिंता न किमपि करिता ते**

क्रांतिकारकांचं हे वैशिष्ट्य सांगितलं, की ते कुठलीही चिंता करत नाहीत. कुठून कुठे जायचं? विचार नाही करायचा. खूप लोक म्हणतात, की क्रांतिकारकांच्या सगळ्या गोष्टी खूप उतावळेपणाने केलेल्या असतात. त्यांचं काही planning नसतं. क्रांतीच्या गोष्टी planning करून होतील का? वर्तमानपत्रात छापून द्यायचं का की आमचं हे planning आहे म्हणून? कोणताही माणूस आपल्याला पकडून देईल अशा प्रकारची परिस्थिती असताना ते कुठलं नीट planning करत बसतील? शक्य तेवढं योजनाबद्ध पण उतावळं, वेगवान, धडक देणारं, धडाका उडवणारं, धडक भरवणारं असंच क्रांतिकार्य असतं. त्यांना असंच करणं भाग असतं.

**कोठूनि आणखी कोठे चिंता न किमपि करिता ते**
**ही मिरवणूक जी माते नटनटुनि थटुनि ह्या वाटे**
**ये रिघू तीत तो नाचनाचता मारे**
**पथ शिरे स्मशानी! ज्यांत तुझे ते घर रे ।।५।।**

हा पथ कुठे शिरतो? तर स्मशानामध्ये शिरतो आणि त्याच्यामध्येच तुझं घर आहे, म्हणजे या क्रांतिकारकांना मेल्यानंतर तुझ्यापर्यंत पोहोचता येतं. थोडक्यात म्हणजे सगळ्या वीर पुरुषांना वीर मरण प्राप्त झालं तर मुक्ती मिळते, या कल्पनेनुसार या सगळ्या युगांच्या शेवटी जाऊन तुझा माग काढायचा त्यापेक्षा क्रांतिकारकांच्या गटात सामील होऊन स्मशानाच्या मार्गाने तुझ्यापर्यंत येऊन पोचतो. त्यामध्ये सौंदर्य आहे, विलक्षण तेजही आहे. मग ते पुढे म्हणतात–

**जरि राजमार्ग जे मोठे**
**तुझ्या याचि घराचे ते ते घर अन्य असेलचि कोठे**

हे सगळे मार्ग तुझ्याच घराला जाणार आहेत.

**ह्या अरुंद आळीतुनि ते,**
**मी म्हणुनि अणूंच्या बोगबोगद्यांतुनि रे**

हे सगळे राजमार्गसुद्धा तुझ्याकडेच जातात. हे छोटे अरुंद बोळ, आळ्या– म्हणजे सूक्ष्मामध्ये शिरणे. ते सूक्ष्मामध्ये शिरून त्याच्यापर्यंत जाण्याच्या मार्गाबद्दल बोलतात. विचार करा, या सूक्ष्म मार्गाने त्याच्यापर्यंत जायचं तर, किती अरुंद?

**मी म्हणुनि अणूंच्या बोगबोगद्यांतुनि रे**

अणूंमध्ये असलेल्या बोगद्यामधून, म्हणजे अणूंमध्ये जी पोकळी असते त्यामधून

**हिंडुनी बघे घर अन्ति तुझे सामोरे ।।७।।**

म्हणजे एक क्रांतीचा मार्ग तुझ्यापर्यंत येतो. दुसरा अगदी सूक्ष्मामध्ये शिरलं, तर तो मार्ग तुझ्यापर्यंत येतो. आणि तो मार्ग किती सूक्ष्म, अणूंच्या बोगद्यातून जावं लागतं. म्हणजे अणूंमध्ये असलेल्या सूक्ष्म पोकळीपेक्षाही सूक्ष्म वाटेने जावं लागतं. घर शोधणं किती अवघड आहे ते सांगतात. हे सगळं अंदमानमध्ये चाललेलं आहे हे लक्षात घेतलं पाहिजे! तिथे कमालीचे छळ चाललेले असताना हे काव्य स्फुरलं आहे. त्यानंतर ते देवाला थोडे रागवतात, की अरे

**घर दुजे बांधु देईना**

आता सगळं विश्वच त्याचं आहे. तोच विश्वरूपाने नटला आहे. दुसऱ्या कोणाला घर बांधू देत नाही. कारण की सगळं त्याचंच आहे.

**घर दुजे बांधु देईना, आपुले कुणा उघडीना!**
**हा यत्न असा चालेना**

याच्या घरात शिरायचा प्रयत्न करून काही उपयोग नाही. प्रयत्न चालत नाहीत.

**हा यत्न असा चालेना, बसवे न सोडुनी यत्ना**

पण प्रकृतीही यानेच दिलेली आहे, की कर्म करत राहा. माझ्या जवळ येण्याच्या, स्वतःच्या जवळ येण्याच्या प्रेरणाही त्यानेच दिलेल्या आहेत आणि घरही उघडत नाही, कितीही प्रयत्न केले तरी याचं घर उघडत नाही, त्यामुळे प्रयत्न करून उपयोग नाही. पण प्रयत्न केल्याशिवाय राहवतही नाही. अशी स्थिती सुंदर प्रकारे व्यक्त केली. खरोखरच माणसाची ही पूर्वापार कृती आहे– परमेश्वरापर्यंत पोहोचण्याची. परमेश्वर काही दार उघडत नाही आणि माणूस काही प्रयत्न करण्याचं सोडत नाही.

अगोदर म्हटलं होतं ना, की

**ठोठावित थकलो! अजुनि नुघडती बा रे**
**आंतूनि तुझी ती बंद सदोदित दारे।।**

आणि परत मी तुझ्या इथे येणार नाही असं म्हटलं होतं. शेवटी परत म्हणतात,

**ठोठावित अजि मी म्हणुनि पुनरपि बा रे**

**ती तुझ्या घराची बंद सदोदित दारे।।**

मी पुन्हा ठोठावतोय कारण माझी प्रवृत्ती मला शांत बसू देत नाही. त्यामुळे तू दार उघडलं नाहीस, तरी मलाही प्रयत्न केल्यावाचून राहवणार नाही हेही मला माहीत आहे. त्यामुळे मग, नुसतं पडून राहण्यापेक्षा ठोठवा ना दार! अत्यंत सौंदर्यपूर्ण काव्य आहे हे– 'अज्ञेयाचे महाद्वार.'

याहीपेक्षा एक अतिशय सुंदर काव्य सावरकरांना स्फुरलं. त्या काव्याविषयी न. चिं. केळकरांनी असं म्हटलं आहे, की 'एवढं एकच काव्य सावरकरांनी लिहिलं असतं तरी त्यांना महाकवी म्हणून संबोधलं गेलं असतं.' त्या काव्याचं नाव आहे '**जगन्नाथाचा रथोत्सव**'–

**ऐश्वर्ये भारी । ह्या अशा । ऐश्वर्ये भारी**
**महाराज, आपुली कथा ना, कुठे निघे स्वारी।।धु।।**

इथे ईश्वर, परमात्मा हेच महाराज आहेत. ऐश्वर्याने युक्त अशी ही सगळी स्वारी म्हणजे मिरवणूक निघाली आहे. कोणाची मिरवणूक? तर परमात्म्याची. अव्यक्तातून व्यक्त विश्व निर्माण होणे हीच मिरवणूक आहे आणि तिच्यातून एवढं ऐश्वर्यवान विश्व निर्माण झालं.

हा रथ कुठला आहे? दिशा आणि क्षितिज मिळून बनलेला असा भव्य रथ आहे. किती भव्य कल्पना असावी याचं हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

**दिक्क्षितिजांचा देदीप्य रथ तुझा सुटता**
**ह्या कालपथाच्या अतुट उतरणीवरता**

काळाच्या पथावरून हा दिशा आणि क्षितिजांचा देदीप्यमान रथ जात असताना

**नक्षत्रकणांचा उठे धुराळा वरता**

सगळ्या आकाशामध्ये नक्षत्रकणांचे धुराळे उडत आहेत. काळाचा पथ असल्यामुळे मैलाचे दगड नाहीत तर युगांचे आहेत.

**युगक्रोश दूरी । मागुती । युगक्रोश दूरी ।**
**महाराज, आपुली कथा ना, कुठे निघे स्वारी?।।१।।**

हा रथ कोठे चालला आहे? खरं तर कोणी विचारू नये कुठे चाललात म्हणून, पण राहवतच नाही म्हणून मी विचारतो.

**पुसूं नयेचि परी । पुसतसे । पुसूं नयेचि परी ।**
**मिरवणूक ही किमर्थ अथवा कुठे निघे सारी?**

तुम्ही सगळे निघाला आहात कुठे? सगळीकडेच परमात्मा आहे.

**दुज्या कुण्या द्वारी । जावया । दुज्या कुण्या द्वारी**
**किंवा केवळ मिरवत येई परत निजागारी**

नुसतंच मिरवून दुसऱ्या कुठल्या द्वारात जाणार? सगळीकडे तुझंच द्वार आहे, त्यामुळे दुसरीकडे कुठे जाणार नाही. परत मिरवत तुझ्याच घराकडे येणार. म्हणजे अव्यक्तातून व्यक्त विश्व निर्माण होणे ही मिरवणूक. पुन्हा व्यक्त विश्व अव्यक्तात जाते, याच घरामध्ये येते. पण हे सगळं चाललेलं असताना–

**ह्या सूर्यशतांच्या किती मशाली जळती**
**मधुनीच शतावधि चंद्रज्योति ह्या अडती**

या मिरवणुकीच्या वेळी शेकडो सूर्यांच्या मशाली जळत आहेत. मधूनच चंद्रज्योती उडतात, म्हणजे ते चंद्र काही काळानंतर, काही युगांनी विझून जातात. म्हणून या चंद्रज्योतीच आहेत. ते पुढे म्हणतात,

**सरसरत बाण हे धूमकेतुचे सुटती**
**कितिदा आणि तरी । हीहि तै । कितीदा आणि तरी**
**उठे चमकुनी रात्रि पुरातन तिच्या अंधकारी ।।२।।**

रात्र तिच्या अंधकारातून चमकून उठते, मिरवणूक पुन्हा सुरू होते, मग पुन्हा आपल्या मूळ अद्वैतामध्ये येते, पुन्हा झोपून जाते– अशा प्रकारे ही मिरवणूक चालली आहे.

**जीवाचीच किती । कथा ह्या । जीवाचीच किती**
**रथासी जगन्नाथ, तुझ्या ह्या ओढू जे झटती**

असा तुझा रथ. सगळे भूतमात्र आपल्या इच्छा ओढत ओढत त्याच्याबरोबर धावतात, पण

**इच्छांत आणि ह्या भूतमात्र वेगांच्या**
**ओवून लगामा तुझ्या परम इच्छेच्या**

तुझ्या परम इच्छेचा लगाम या सगळ्यांच्या इच्छांमध्ये आहे. त्यामुळे यांच्या इच्छा असून काही उपयोग नाही. ती इच्छा घेऊन ते रथ ओढतात पण शेवटी तुझीच इच्छा खरी.

**त्या अतुट उतरणीवरती हो काळाच्या**
**खेळत हा अतली । रथोत्सव । खेळत हा अतली**

(पुढील मजकूर पृष्ठ क्र. २३ वर...)

# सरस रामायण

## किष्किंधाकाण्ड (लेखांक ७)

**(पूर्वसूत्र- सीतामाईंच्या शोधात दक्षिण दिशेला गेलेल्या तुकडीतले सर्व वानर एका बिळात शिरून खाली मोठ्या विवरामध्ये फुला-फळांनी लगडलेल्या अतिशय सुंदर अशा आश्रमात जाऊन पोहोचले. तिथे महातपस्विनी स्वयंप्रभेने त्यांचे स्वागत आणि श्रमपरिहार केला. 'इथे केवळ रामभक्त येऊ शकतील आणि त्यांचे आदरातिथ्य तुझ्याकडून झाल्यावर तुझे तप पूर्ण होईल व तू मुक्त अवस्थेला जाशील', असा वर ब्रह्मदेवाने तिला दिलेला होता.)**

तिच्या आदरातिथ्याने अंगात दुप्पट शक्ती संचारलेले वानर आता त्यांच्या सीताशोधाच्या कार्याला निघायचे होते आणि सुग्रीवाच्या राज्याच्या जवळ असलेल्या वनात वास्तव्य करून असलेल्या श्रीरामप्रभूंचे दर्शन घेऊन स्वयंप्रभा विष्णुलोकी जायची होती. या वानरांना सीतेच्या शोधात नक्की कुठे जायचे आहे हे माहीत होते. म्हणून तिने त्यांना 'डोळे मिटा आणि थोड्या वेळाने ते उघडल्यावर तुम्ही योग्य मार्गावर आहात हे कळेल', असे सांगितले. वानरांनी डोळे मिटल्यानंतर तिच्या तपःसामर्थ्याने तिने त्यांना योग्य ठिकाणी नेऊन ठेवले आणि स्वतः प्रभू रामचंद्रांच्या दर्शनासाठी निघून गेली. वानरांनी डोळे उघडले तेव्हा त्यांना असे दिसले, की ते सागरतीरावर आहेत.

स्वयंप्रभेच्या आश्रमामध्ये भरपूर खाणं-पिणं झाल्यामुळे जांबुवंत, हनुमंत, अंगद आणि सर्वच जण चांगलेच ताजेतवाने झालेले होते. पण 'सीतामातेचा शोध' या ज्या कारणासाठी ते तिथे येऊन पोहोचले होते, त्याला आता पुढे वाटही नव्हती. सीतेला समुद्रात आता कुठे शोधणार होते? आणि प्रभू रामचंद्रांनी दिलेली एक महिन्याची मुदत तर जवळजवळ संपलीच होती.

सीतेचा शोध लागलेला नाही, पुढे काही वाट नाही अशा परिस्थितीत दिङ्मूढ होऊन ते सागराच्या लाटा पाहत बसले होते. त्या वेळी त्यांच्या अंतःकरणात मात्र अपयशाच्या कल्पनेमुळे येणाऱ्या दुःखाच्या लाटा सागराच्या लाटांप्रमाणे अविरतपणे येत होत्या. परत तसेच गेल्यास रामप्रभूंना तोंड कसे दाखवायचे, हा एकच विचार त्यांच्या चित्ताला व्यापून होता. कारण सीतेच्या शोधासाठी याच तुकडीवर प्रभूंची भिस्त होती हे सर्वांना माहीत होते. एव्हाना इतर तुकड्या परत गेल्याही होत्या आणि त्यांनी आपले अपयश प्रभूंना निवेदन केले होते. पण प्रभू त्यांना असे म्हणाले होते, की 'ज्या दिशेला सीता नाही त्या दिशेला तिचा शोध लागेलच कसा? त्यामुळे तुम्ही वाईट वाटून घेऊ नका.' आणि त्यामुळेच सुग्रीवानेही त्यांना कोणतीही शिक्षा किंवा शब्दानेही त्रास दिला नव्हता. पण या दक्षिण दिशेला गेलेल्या तुकडीमध्ये मात्र सर्व महाबलवान वीर होते. पाठीमागे जायलाही वाट नाही कारण काम पूर्ण झाल्याशिवाय पाठीमागे जाता येत नव्हते आणि पुढेही वाट नाही अशी त्यांची स्थिती होती. असेच परत जाऊन सुग्रीवाच्या हातून मरण्यापेक्षा इथेच रामस्मरणामध्ये बसून राहून प्रायोपवेशन (म्हणजे अन्नपाणी वर्ज्य) करून राहू आणि प्राणत्याग करू असे त्यांनी ठरवले.

जिथे हे वानर बसून राहिले होते तो किनारा महेंद्र पर्वताच्या पायथ्याशी होता. त्या किनाऱ्यालगत असलेल्या एका शिखरावरून एक गृध्र म्हणजे गिधाड त्यांना पाहत होते. आयते एवढे भक्ष्य पाहून ते आनंदित झाले होते. ते सामान्य गिधाड नव्हते. ते एवढ्या महाप्रचंड आकाराचे गिधाड होते, की ते या वीरांना सहज खाऊ शकणार होते.

यांना पाहून त्या गिधाडाने मोठा आनंद व्यक्त केला आणि चित्कार केला. तेव्हा सर्वांचे लक्ष त्या गिधाडाकडे गेले. आता आपण वाचत नाही हे सर्वांना मनोमन कळून चुकले. ते गिधाड म्हणाले, 'कितीतरी दिवसांच्या खाण्याची सोय झाली.' आता जवळपास मरायला तयारच व्हायला पाहिजे होते.

तेवढ्यात युवराज अंगदाच्या मनामध्ये विचार आला, की याच्याशी बळाने प्रतिकार करणे काही शक्य नाही; पण कधीकधी जिथे बळ काम करत नाही तिथे बोल काम करतात. आपण बोलून तर बघू. म्हणून तो म्हणाला, 'आजवर पाहिलेल्या सर्वांमध्ये युद्धात रावणाच्या हातून मारला गेलेला आणि रामकार्य करताना मरण पत्करून परम गतीला गेलेला गृध्र (म्हणजे गिधाड) जटायू हाच धन्य होय.'

गिधाड जटायूचा गौरवास्पद उल्लेख अंगद करीत राहिला आणि अंगदाच्या अंदाजाप्रमाणे त्याचे शब्द काम करून गेले. अचानक त्या गिधाडाची मुद्रा बदलली आणि तो एकदम व्याकूळ होऊन बोलू लागला, 'माझा सख्खा भाऊ जटायू याला जाणणारे तुम्ही कोण आहात? माझ्या परमप्रिय बंधूची वार्ता तुमच्याकडून इतक्या वर्षांनी प्रथमच कळत आहे. तुम्ही माझ्या जवळ या, माझ्यापासून तुम्हांला आता भय नाही.' असे त्याने आश्वासन दिले आणि हकिकत सांगायला सुरुवात केली.

**संपातीची कथा-**

जवळ आलेल्या सर्वांना ते गिधाड सांगू लागले, 'माझे नाव संपाती. जटायू आणि मी सख्खे भाऊ. दोघांच्याही जवळ प्रचंड शारीरिक सामर्थ्य होते. तारुण्याच्या भरात आणि सामर्थ्याच्या मदामध्ये आम्ही एकदा सूर्यावर जायचे ठरवले. त्याला जाऊन भिडायचे म्हणून त्या दिशेने उडत चाललो. जसे जसे उंच जाऊन उडत होतो, तसा सूर्यही माध्यान्हीला येत होता. त्याचा ताप सहन करणे अशक्यच होते म्हणून जटायू वाटेतून परत फिरला. आणि मी मात्र त्याच सामर्थ्याच्या मदामध्ये उडत राहिलो. थोडं जास्त जवळ गेल्यावर माझे दोन्ही पंख होरपळून गेले आणि मी विंध्य पर्वतावर पडलो. जटायूची आणि माझी ताटातूट झाली. नंतर आम्ही परस्परांना कधीही भेटलो नाही. इतक्या वर्षांनंतर तुमच्या तोंडून माझ्या प्राणप्रिय भावाचं नाव मी ऐकलं.

'पंख होरपळलेल्या स्थितीत मी पडून होतो तेव्हा मला पाहून माझे आणि जटायूचे पिता म्हणजे सूर्यदेवाचा सारथी अरुण यांना फार कळवळा आला. त्यांनी सूर्याची प्रार्थना केली. सूर्याने म्हटले, 'जो माझ्याशी नम्र होऊन राहतो त्याला माझ्यापासून ताप होत नाही. पण गर्वमदाने ताठ होऊन माझ्याकडे येणाऱ्याला त्रास होणारच! तरीही मी तुला सांगतो, की हे केवळ तुझे पुत्र होते म्हणून वाचले नाही तर भस्मच झाले असते. तुझ्या पुत्रांचा उद्धार होण्यासाठी मी वरदान देतो, की रावण सीतेला आश्रमातून कपटाने पळवून नेत असताना जटायू त्याच्याशी युद्ध करेल आणि मरणोन्मुख जटायूचा रामस्पर्शाने उद्धार होईल, आणि रामभक्तांच्या संगतीमध्ये रामनाम स्मरण ऐकल्याने संपातीला पुन्हा पंख निर्माण होतील आणि मुख्य म्हणजे त्याचा देहाभिमान गळून जाऊन त्याचा उद्धार होईल.' ती वेळ जवळ आली आहे. प्रथम मला पाण्याप्रत न्या म्हणजे बंधू जटायूला मी पाणी देतो.' असे संपातीने म्हणताच सर्वांनी त्याला उचलून समुद्राच्या पाण्याजवळ नेले. संपातीने रामनाम स्मरणपूर्वक जटायूला पाणी दिले. तेव्हा त्याला पंख फुटले.

पंख फुटल्याने आनंदित झालेला संपाती सर्वांना म्हणाला, की 'आम्हां गृध्रांना विशेष तीक्ष्ण दृष्टी असते. त्यानुसार मला येथून समुद्राच्या पलीकडे असलेल्या लंकेमधील अशोकवनामध्ये शोकमग्न असलेली दिव्य सुंदर स्त्री सीतामाता दिसत आहे. तिचा शोध घेण्यासाठी म्हणून तुम्ही निघालेले आहात. तिच्यापर्यंत पोहोचण्यासाठी शंभर योजने विस्तार असलेला समुद्र पार करून जावे लागेल. मीही हे काम करू शकलो असतो. रावणाचा निःपात करून सीतामातेला सोडवून आणू शकलो असतो परंतु श्रीरामस्मरणाने आणि रामकृपेने माझा देहाभिमान गळून जाऊन हे कार्य माझे नाही हे मला कळून आले आहे. त्यामुळे तुम्हांला शुभेच्छा देऊन मी निघतो.'

सूर्याच्या वरदानामुळे संपातीच्या शरीराला नवे पंख फुटले होते. तसेच, रामस्मरणाने देहाभिमान गळून गेल्याने त्याच्या चित्तालाही दिव्य भावनांचे पंख फुटले होते. गिधाडांच्या तीक्ष्ण दृष्टीबरोबर त्याला आंतरिक ज्ञानदृष्टीही प्राप्त झाली होती. याचे कारण हनुमंतांसारख्या रामभक्तांचे सान्निध्य आणि अंतरामध्ये नामाने रामाचे सान्निध्य.

संपाती तर सीतेचा ठावठिकाणा सांगून निघून गेला पण सर्व वीरांपुढे नवीन प्रश्न उभा राहिला, की हा शंभर योजने विस्तार असलेला समुद्र पार करून जाईल कोण? आणि कसा? प्रत्येकाने आपण किती उड्डाण करू शकतो हे सांगायला सुरुवात केली.

त्यांमध्ये जांबुवंत, अंगद आणि हनुमंत हे तिघे समुद्र उल्लंघून जाऊ शकण्याच्या सामर्थ्याचे होते. पण बुद्धिमान जांबुवंताने हे जाणले होते, की हे कार्य हनुमंताने करावे अशी रामाची योजना आहे. म्हणूनच रामाने सीतेला ओळख पटविण्यासाठी हनुमंताला मुद्रिका दिलेली आहे. रामाची कोणतीही कृती अकारण वा निरर्थक असणे शक्य नाही. पण तूच का जात

• आई कै. सविता शरद कुलकर्णी यांच्या प्रथम स्मृतीप्रीत्यर्थ श्री. स्वानंद कुलकर्णी यांजकडून पृष्ठप्रायोजन •

नाहीस? किंवा अंगदाला का पाठवीत नाहीस? याचे उत्तर जांबुवंताला देणे भाग होते. म्हणून जांबुवंत सांगू लागला–

'मी शंभर योजने समुद्र पार करून गेलो असतो पण आता मी वृद्ध झालो आहे. अंगदही शतयोजन समुद्र पार करून जाईल पण तो तसाच परत येऊ शकेल का नाही याबद्दल त्यालाच शंका आहे. शिवाय तो आपला युवराज आणि सेनापती आहे, तो आपल्या सर्वांचा स्वामी आहे. सेनेने त्याचे रक्षण करावयाचे असते. त्यामुळे त्यालाच काम सांगणे योग्य नाही.'

त्यानंतर जांबुवंत थोड्या अंतरावर बसलेल्या हनुमंताकडे गेले. त्यांनी त्याला त्याच्या ठायी वसत असलेल्या शक्तीची जाणीव करून दिली. हनुमंताला शक्तीची जाणीव करून द्यायचे काही कारण होते, ते असे–

हनुमंत जन्मतःच विलक्षण बलशाली होता. उगवत्या लाल रंगाच्या सूर्याला पाहून हे फळ आहे असे वाटून त्यासाठी तो जर सूर्याकडे उड्डाण घेऊन झेपावला होता, तर त्याच्या दृष्टीने शंभर योजने समुद्र पार करणे ही फार किरकोळ गोष्ट होती. अशा हनुमंताच्या अंगी बालपणी प्रचंड शक्ती सळसळत असे. तो नाना उत्पात करीत असे. एकदा त्याने ऋषींच्या यज्ञामध्ये मोठा हत्ती आणून टाकला तेव्हा ऋषींनी त्याला शाप दिला, की 'तुझ्या सामर्थ्याचा तुला विसर पडेल. जेव्हा तुझ्या जीवनातील मुख्य काम करण्याची वेळ येईल त्या वेळी जर कोणी तुझ्या सुप्त शक्तीची तुला जाणीव करून देईल तरच तू आपल्या महाशक्तीने कार्य करू शकशील.' सागरकिनारी अधोमुख बसलेल्या हनुमंताला जांबुवंताने त्याच्या प्रचंड शक्तीची जाणीव करून दिली. त्याला विविध देवांकडून प्राप्त झालेल्या अनेकविध वरांची आठवण करून दिली, की 'या वरांमुळे शस्त्रास्त्रे, तसेच अग्नीसुद्धा तुला कोणतीही इजा करू शकणार नाही. तू कोणतेही स्थूल, सूक्ष्म रूप धारण करू शकशील, तुला मृत्यूचे भय नाही. तू चिरंजीव आहेस. आता पुढे असलेल्या रामकार्यासाठी तुझे सामर्थ्य उपयोगात आण. हेच तुझे मुख्य जीवित कार्य आहे.' अशी जबरदस्त प्रेरणा जांबुवंताकडून मिळाल्यावर हनुमंतामध्ये ती सुप्त शक्ती पुन्हा जागृत झाली.

हनुमंताने प्रचंड मोठी गर्जना केली. आपले शरीर प्रचंड मोठे वाटेल तेवढे वाढू शकते हे बघितले. जांबुवंतापाशी जाऊन त्याला विचारले, 'ज्या त्रिकूट शिखरावर लंका वसली आहे ते अख्खं त्रिकूट शिखर इथे आणू का? का केवळ रावणाला मारून सीतामातेला घेऊन येऊ?'

जांबुवंत म्हणाला, 'अशा काही गोष्टी करायला भगवान श्रीराम प्रभूंनी आपल्याला सांगितलेले नाही. तिचा शोध करणे हेच तुझे काम आहे. सीतामातेला सोडवून आणण्याचा भाग प्रभू सांगतील त्याप्रमाणे आपण करू.'

हनुमंतामधला रामसेवक जागृत होताच. तो विनम्रपणे म्हणाला, 'आपण म्हणता ते खरे आहे. मी रामदूत आहे, रामसेवक आहे, हीच माझी भूमिका राहील.' सर्वांना नमस्कार करून, सर्वांचे आशीर्वाद घेऊन समर्थांनी म्हटल्याप्रमाणे–

**रामदासी अग्रगण्यू कपिकुळासी मंडणु ।**
**रामरूपी अंतरात्मा दर्शनें दोष नासती ।।**

असा तो मारुती उठला. आता त्याचं खरं दर्शन पुढच्या काण्डापासून सुरू होणार आहे. आता हा मारुती केवळ किष्किंधेतला वीर राहिला नाही. आता मारुतीच्या पराक्रमाचं सुंदरकाण्ड सुरू होईल.

मारुती महेंद्र पर्वताच्या शिखरावर जाऊन उभा राहिला. भगवान श्रीरामांबरोबर आपला पिता वायुदेव याचे स्मरण करून त्यांचे सर्व बल अंगी असलेल्या मारुतीने उड्डाण केले. त्याबरोबर त्या जोराने महेंद्र पर्वत खाली पृथ्वीच्या आतमध्ये गेला. आणि रामायणाच्या कथेत मारुतीच्या पराक्रमाचे सुंदरकाण्ड सुरू झाले.

**✻ श्रद्धांजली ✻**

**'स्वरूपयोग'ला सर्वतोपरी साहाय्यभूत होऊन राहिलेल्या**
**सद्‌भक्त कलाताई फडणीस**
**दि. १२ फेब्रुवारी २०१८ रोजी कैलासवासी झाल्या.**
**त्यांच्या स्मृतीला अभिवादन!**
**– स्वरूपयोग परिवार –**

**• स्वरूपयोग वार्तापत्रास २१व्या वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!**
**स्वामीजी व सौ. आशाताई यांना प्रणाम! सौ. रोहिणी मांडवगणे, पुणे •**

# श्रीमत् दासबोध स्वाध्याय

## नामस्मरणभक्ती, दशक ४, समास ३, लेखांक ३

इतर साधनं आणि नामस्मरण यांची तुलना करताना गोंदवलेकर महाराजांनी असं म्हटलं आहे की 'इतर साधनं ही घरातील वेगवेगळ्या खोल्यांप्रमाणे आहेत. पण नाम हे छपरासारखं आहे.' त्यामुळे छप्पर महत्त्वाचं आहे. संरक्षण त्या छपराने मिळत असतं. खोल्या कमी-अधिक असल्या तरी चालतील पण छपराची आवश्यकता आहे. अजून काही गोष्टी सांगताना मोठं काव्यमय वर्णन महाराजांनी केलं आहे. अलीकडच्या काळामध्ये इतकं गद्य काव्य क्वचितच कुठे पाहायला मिळेल. त्यांनी असं म्हटलंय की 'उंबरठ्यावरती दिवा ठेवला तर जसा दोन्हीही खोल्यांमधे प्रकाश पडतो, तसं आपल्या अंतःकरणामध्ये नामस्मरण चालू असेल तर प्रपंच आणि परमार्थ दोन्ही बाजूंना प्रकाश पडेल. त्या प्रकाशात नीट वाटचाल करता येईल.' सर्व संतांनी नामस्मरणाचं एवढं महत्त्व सांगण्याचं कारण काय? तर कुठलंही साधन असं डायरेक्ट आणि ताबडतोब ईश्वराला अंतःकरण जोडत नाही.

कोणीतरी विचारलं होतं की स्तोत्र म्हणणं आणि नाम यांत काय फरक आहे? महाराज म्हणाले, 'स्तोत्र म्हणणं म्हणजे पत्राद्वारे परमेश्वराची भेट घेण्यासारखं आहे आणि नाम म्हणजे प्रत्यक्ष बोलण्यासारखं आहे.'

कथांमध्ये तर सौंदर्य आहेच आहे. त्यामुळे आपल्याला आल्हादही होतो. उदाहरण सांगायचं झालं तर कृष्ण माती खातो. यशोदा त्याच्या पाठीमागे धावत जाते आणि एकदम 'उघड बघू, काय आहे तोंडात बघू.' मुलाच्या तोंडाला धरतात आणि दाबतात तसं ती दाबते. त्याने 'आ' केल्यावर तिला आतमध्ये सगळं ब्रह्मांड दिसतं. ते बघितल्यावर ती विलक्षण घाबरते आणि असं काहीतरी त्याच्या तोंडामध्ये पाहिल्यानंतर ती एकदम घाबरणारच हे अगदी नॅचरल आहे. ती घाबरून डोळे झाकते, आणि तिच्या मनात जे येतं, त्याचं तुकाराम महाराजांनी वर्णन केलंय, 'आता यांस काय म्हणावे लेकरू' याला काय लेकरू म्हणायचं? 'जगाचा हा गुरू मायबाप।।' हा जगाचा गुरू मायबाप आहे, याला आता लेकरू म्हणता येणार नाही. डोळे मिटल्यानंतर हा देवच आहे हे तिच्या लक्षात येतं. तेवढ्या वेळात तिच्या मनात येतं, 'जर हा देव आहे असं प्रत्यक्ष प्रकट केलं, तर त्याचा आणि माझा- आई आणि मुलगा हा जो भावनात्मक संबंध आहे तो नष्ट होईल.' म्हणून डोळे उघडायच्या आत ती असा विचार करते, की 'आपण काही पाहिलंच नाही असं दाखवूया आणि हा संबंध अबाधित ठेवूया.' म्हणून झाकलेले डोळे उघडताना ती म्हणते, 'परत माती खाऊ नकोस बरं का!' त्यामुळे तिला हे माहिती आहे की हा देवच आहे, पण संबंध तसाच अबाधित ठेवायचा आहे. कृष्ण म्हणतो, 'नाही खाणार'. म्हणजे त्यालाही हे माहिती आहे की तिला कळलेलं आहे पण त्यालाही हा संबंध अबाधित ठेवायचा आहे. अशा प्रकारे अंतःकरणाचा संबंध आहे.

या कथेमध्ये असलेलं सौंदर्य बोधही देतं, की **'तुमचं भगवंताशी काहीतरी नातं जोडलं गेलं पाहिजे आणि तो संबंध तुम्ही टिकवला पण पाहिजे.'** पण जरी हा बोध झाला आणि जरी कथा खूप सुंदर असली, तरी प्रत्यक्ष अंतःकरणाचा संबंध परमेश्वराशी निर्माण होण्यासाठी, तो अखंडित टिकण्यासाठी म्हणून एक माध्यम सतत माझ्याजवळ असलं पाहिजे. कथा सारखी कशी नि किती ऐकणार? आणि त्यानंतर बोध किती करून घेणार? प्रत्यक्ष परमेश्वराशी संबंध ज्यामुळे निर्माण होतो, ते पवित्र नाम जर आपण सदोदित स्मरत राहिलो, तर तो परमेश्वर 'नाम'रूपाने आपल्या अंतःकरणात वास करतो आणि त्यानंतर ते नाम त्याची अनुभूती कसं देतं, त्याची काही प्रक्रिया आहे का, हेही जाणलं पाहिजे.

मुख्य गोष्ट काही होत असेल तर नामस्मरणामुळे अंतःकरणाला शुचिता येते. तुकाराम महाराजांनी म्हटलं आहे-

'पवित्र तो देह वाणी पुण्यवंत। वदे जो अच्युत सर्वकाळ।।'

म्हणजे देह पवित्र अंतःकरणाचा होतो, हे त्याचं मुख्य वर्म आहे. आता त्याची प्रक्रिया काय आहे, ते एकाच ठिकाणी एकांतात कसं घ्यायचं आणि लोकांतात कसं घ्यायचं हे बघू.

• श्री. नारायण नामदेव रकटे, लग्नाच्या वाढदिवसाप्रीत्यर्थ (२८ फेब्रुवारी) पृष्ठप्रायोजन, एक साधिका, पुणे •

**सुखदुःख उद्वेग चिंता।**
**अथवा आनंदरूप असतां।**
**नामस्मरणेंविण सर्वथा। राहोंच नये ।।४।।**
**हरुषकाळीं विषमकाळी।**
**पर्वकाळीं प्रस्तावकाळीं।**
**विश्रांतिकाळीं निद्राकाळीं। नामस्मरण करावें ।।५।।**

थोडक्यात कुठल्याही काळी नामस्मरण करावं असं त्यांना सांगायचं आहे.

**चालतां बोलतां धंदा करितां।**
**खातां जेवितां सुखी होतां।**
**नाना उपभोग भोगितां। नाम विसरों नये ।।७।।**

चालता, बोलता, धंदा करिता म्हणजे कुठलीही क्रिया करताना तुम्हांला नामस्मरण करायला काय हरकत आहे? म्हणजे क्रियात्मक भागामध्ये आम्ही एका ठिकाणी बसून पूजा करणं, ध्यान करणं, कुठेतरी कीर्तनाला वा प्रवचनाला श्रवणासाठी जाणं– या सगळ्या गोष्टी करत असताना, दररोजच्या व्यवहारापेक्षा वेगळं काहीतरी करायला लागतं. ती आमची आवडही असते आणि त्यानुसार ते आम्ही करूही! परंतु माझा दररोजचा व्यवहार चाललेला असताना माझ्याबरोबर कुठलं साधन येतं, तर नामस्मरण!

चालता, बोलता, धंदा करिता म्हणजे तुझा जो व्यवहार आहे त्याच्यातच! स्वामी माधवनाथ थोडं गमतीने म्हणत असत, 'चालता, बोलता, धंदा करिता, पण धंदे करिता नाही.' म्हणजे वेडेवाकडे धंदे करत आपलं नामस्मरण चाललंय तर ते परिणामकारक होणार नाही. कदाचित ते परिणामकारक असं होईल की 'असे धंदे करू नये असं वाटेल.' म्हणजे जे उद्योग करायचे ते पवित्र असले पाहिजेत.

सूक्ष्म असं परमात्मतत्त्व, त्याचा अनुभव घ्यायचा आहे आणि तो अनुभव घेण्याच्या पातळीवर जायचं असेल तर तुझा बाह्य जीवनव्यवहार हा शुचितापूर्ण असला पाहिजे, शुद्ध असला पाहिजे.

'जेणे विठ्ठलमात्रा घ्यावी। तेणे पथ्ये सांभाळावी।' असं तुकाराम महाराजांनी म्हटलेलं आहे. ही मात्रा कशीतरी घेऊन चालणार नाही. त्याची पथ्यंही सांभाळली पाहिजेत. चांगलं आचरण हे त्याचं पथ्य, तू व्यवस्थित वागलं पाहिजेस तरच ते नाम परमेश्वराशी अंतःकरण जोडेल. चोरटेपणाने अंतःकरण जोडलं जात नाही. अंतःकरणाच्या सत्प्रवृत्ती वाढवण्याचं काम नामस्मरण करतं. ते समजून देतं की, ही गोष्ट बरोबर नाही. आपल्याला अगोदर कळत असतंच, पण नामस्मरण करणाऱ्या व्यक्तीला आतून या प्रेरणा जास्त येतात की असं वागता कामा नये. जीवनाची अधिकाधिक शुद्धी होत जाते म्हणजे क्रिया जास्त जास्त शुद्ध होत जाते. त्यासाठी जे नामस्मरण करतं त्या अंतःकरणाची शुद्धी होत जाणं आवश्यक असतं. नुसती जीवनाची शुद्धी इथपर्यंत त्याची व्याप्ती मर्यादित राहत नाही. ज्या परमेश्वरामुळे विश्व निर्माण झालं, ज्या परमेश्वरामुळे हे शरीर निर्माण झालं,

'चाले हे शरीर कोणाचिये सत्ते। कोण बोलवीते हरीवीण।।
देखवी ऐकवी एक नारायण। तयाचे भजन चुको नये।।'

तो कोण आहे ही एक उत्सुकता मनाला लागते.

(क्रमशः)

## अभिनंदन



*आशुतोष पुरोहित हा पुणे युवा केंद्राचा सदस्य. तो Storymirror नावाच्या मराठी लेखकांसाठी असलेल्या एका ऑनलाईन पोर्टलवर ब्लॉग्ज किंवा कविता नियमितपणे पोस्ट करतो, त्या कंपनीकडून नियमितपणे लिखाण करणाऱ्या लेखकांचे ई–बुक प्रकाशित करण्यात आले. त्यात आशुतोषचे 'अबोली' नावाचे ई–बुक प्रकाशित झाले. ही प्रगती स्वामींच्या कृपाशीर्वादानेच होते आहे असे आशुतोष मानतो. आपल्या या युवा सदस्याला प्रोत्साहन देण्यासाठी आपल्यालाही Storymirror ॲप इन्स्टॉल करून ई–बुक स्टोअरमध्ये 'अबोली' हे ई–बुक वाचता येईल.*

**स्वरूपयोग परिवारातर्फे आशुतोषचे अभिनंदन!**

**◆ व्रतबंधानिमित्त चि. तन्मयचे वडील आशिष आणि चि. आरुषचे वडील अमोल देशपांडे यांच्याकडून पृष्ठप्रायोजन ◆**

# श्रीमत् भागवत स्कंध ४ व ५

श्रीमत् भागवतातील चौथ्या स्कंधामध्ये ध्रुवाची अत्यंत रमणीय आणि प्रेरणादायी कथा होऊन गेली. त्यानंतर ध्रुवाचे राज्य, त्याचे अढळपद, विष्णुलोकी प्रयाण हे प्रसंग आले. ध्रुवाच्या कथेच्या अखेर, ध्रुव जेव्हा वैकुंठाला जाण्यासाठी विमानात बसू लागतो तेव्हा त्याला वर चढण्यासाठी पायरीपाशी मृत्युदेव मस्तक पुढे करतात. एक पाय त्यांच्या मस्तकावर व दुसरा पाय विमानात ठेवून ध्रुव आरोहण करतो. हा प्रसंग पाहताना नारदांच्या मनात येऊन जातं, 'ध्रुव वस्तुतः माझा शिष्य पण ध्यानयोगामुळे केवढा प्रगत होऊन गेला!' अंतिम स्थिती साधायला इतर सर्व साधनांचा जरी आधार असला तरी ध्यानयोग हा मध्यवर्ती मार्ग आहे; तो साधायला हवा. केवळ इतर भक्तिसाधने करीत राहिले असता ही स्थिती म्हणजे अंतिम अढळ स्थिती प्राप्त होणार नाही.

ध्रुवाच्या वंशामध्ये पुढे प्रचेता नामक भगवद्भक्त राजा निर्माण झाला. तसेच, ध्रुवाच्या वंशामध्ये अंग नावाचा राजा झाला, जो सदाचारी होता आणि वेन नावाचा राजा झाला, जो दुराचारी होता. वेन राजाच्या काळात अधर्म फार वाढला म्हणून ऋषींनी शाप देऊन त्याचा नाश केला. वेन राजाच्या शरीराचे मंथन केले; त्यात त्याच्या शरीराच्या खालच्या भागातील पाप काढून टाकण्यात आले. नंतर वरच्या पवित्र भागाचे व बाहूंचे मंथन केले असताना जो सत्त्वसंपन्न पुरुष निर्माण झाला त्याचे नाव पृथु ठेवण्यात आले. हा अतिशय सदाचारी आणि पूजे-अर्चेमध्ये रस असलेला, अर्चन भक्तीची साक्षात् मूर्ती असं ज्याला म्हणता येईल असा पृथु राजा होऊन गेला. त्याने उत्तम राज्यकारभार करून प्रजेला सुखी केले.

या वंशात पुढे वर उल्लेख केलेला प्रचेता नामक राजा जन्मास आला. त्याने नारायण सरोवराच्या किनारी नारदांकडून रुद्रगीतेचा उपदेश घेतला. भगवान शंकरांना प्रसन्न करून घेतले. भगवान शंकरांनी त्यांना 'तप करा' असा उपदेश केला. या प्रचेतांचे वडील प्राचीन बर्हि हेही धार्मिक होते. ते यज्ञ करीत असत. त्यांना नारदांनी उपदेश केला होता, की केवळ कर्मकांडी यज्ञ करून कल्याण होणार नाही. या सर्व बाह्य उपासना या चित्तावर चांगले संस्कार करणाऱ्या म्हणजे चित्तशुद्धी करणाऱ्या आहेत पण केवळ यांनीच ईश्वरसाक्षात्कार होऊ शकत नाही. त्यासाठी एकांतात बसून ध्यान करण्याची आवश्यकता असते. कर्मकांडात्मक कृत्यांनी तू स्वर्गात जाशील पण पुण्यसंचय संपला की तुला तिथून हाकलून दिले जाईल. म्हणून आता तू शांततापूर्वक बसून आत्मस्वरूपाचे चिंतन कर. जो स्वतःचे स्वरूप जाणू शकत नाही तो ईश्वराला ओळखू तरी कसा शकेल आणि त्याची भक्ती तरी कशी करू शकेल, असे म्हणून नारदांनी त्या प्राचीन बर्हि राजाला राजा पुरंजनाची कथा सांगितली. त्यात नवविधा भक्तीतील आठवी सख्य भक्ती आणि नववी आत्मनिवेदन भक्ती भगवद्कृपेने प्राप्त होते, हे थोड्या लक्षणार्थाने कथेच्या माध्यमातून सांगितले.

पुरंजनाने अनेक वाईट कर्मे केली पण शेवटच्या काळामध्ये सत्कर्मे केली होती म्हणून त्याला त्या पुण्याईवर एका कर्मकांडी ब्राह्मणाच्या घरी कन्यारूपाने जन्म प्राप्त झाला आणि भक्त पतीशी विवाह झाला. तिला देवाबद्दलचं प्रेम, सत्संगात प्रीती अशी भक्तिरूप कन्या प्राप्त झाली आणि श्रवणम्, कीर्तनम्, पादसेवनम्, अर्चनम्, वंदनम्, दास्यम् असे सहा पुत्र झाले. असे भक्तीचे प्रकार आहेत. यानंतर परमात्म्याच्या कृपेने देवाबद्दलचं सख्य आणि आत्मनिवेदन म्हणजे ध्यान असे पुत्र झाले.

लक्षणार्थाच्या माध्यमातून भागवतामधून वेगवेगळ्या प्रकारांनी हेच सांगितले गेले आहे, की सत्कर्मे करा, विविध भक्तींनी अंतःकरणाची शुद्धी करा आणि अशा अंतःकरणाने स्वतःमध्येच असलेल्या चैतन्यमय परमात्म्याचे ज्ञान करून घ्या. अशा रीतीने प्रचेतांना आत्मज्ञान प्राप्त होणे इथे स्वायंभूव मनूच्या उत्तानपाद या पुत्राच्या ध्रुव ते प्रचेता अशा एकूण वंशाची कथा सांगता सांगता भक्ती आणि ज्ञानाचा उपदेश केला गेला आणि इथेच भागवताचा चौथा स्कंध पूर्ण झाला.

## भागवताच्या पाचव्या स्कंधाचा आरंभ

भागवताच्या पाचव्या स्कंधाची सुरुवात करताना, शुक्राचार्य स्वायंभूव मनूच्या प्रियव्रत या दुसऱ्या पुत्राच्या वंशाचे वर्णन करू लागले. प्रियव्रताने प्रथम नारदांकडून आत्मज्ञानाचा उपदेश

प्राप्त करून घेतला. पृथ्वीवर राज्य केले आणि ते राज्य पुत्रांना देऊन आत्मोपासनेने तो ईश्वरस्वरूपी जाऊन मिळाला. त्याची आणि त्याच्यानंतरच्या वंशाची कथाही फारच दिव्य आहे.

प्रियव्रत हा भगवद्भक्त होता. तो श्रीहरीचे नित्य ध्यान करीत असे. त्याच्या तीन पुत्रांनी आत्मज्ञानाचा अभ्यास करून (परमहंस) दीक्षेचा स्वीकार केला. राजा प्रियव्रत यानेदेखील योग्य प्रकारे संसार करून, लवकरच त्याचा त्याग करून आत्मस्वरूप चिंतनमार्गाचे अवलंबन केले.

राजा प्रियव्रताचा पुत्र आग्निध्र आणि त्याचा पुत्र नाभिराजा. हा मोठा भगवद्भक्त होता. यज्ञ करण्याची त्याला आवड होती. त्याने भगवान विष्णूंसारखा पुत्र व्हावा म्हणून मोठा यज्ञ केला; तेव्हा 'नाभिराजाच्या उदरी मी अंशावतार घेईन कारण 'माझ्यासारखा' पुत्र व्हावा यासाठी त्याने यज्ञ केला आहे, पण माझ्यासारखा दुसरा कुणी नसल्यामुळे मलाच याच्या पोटी जन्म घ्यावा लागेल,' असे म्हणून भगवान ऋषभदेवांच्या रूपाने भगवंतांनी अंशावतार धारण केला.

**ऋषभदेवांची कथा**

ऋषभदेवांनी आत्मविवेकाने जीवन कसे व्यतीत करावे हे दाखवून दिले. प्रजेचे उत्तम पालन केले. त्यांचा सर्वात मोठा मुलगा भरत हा मोठा सद्गुणी आणि महापराक्रमी होता. याच्या नावावरूनच 'भारतवर्ष' असे नाव तो राज्य करीत असलेल्या या प्रदेशाला पडले. ऋषभदेवांनी योग्य वेळी संसारत्याग केला. सर्व राज्य भरताच्या ताब्यात दिले, तेव्हा आपल्या पुत्रांना तप करण्याचा उपदेश केला. अहंकार आणि ममत्वरहित राहण्याचा, वैराग्याचा उपदेश केला आणि ज्ञान-विज्ञान हेच जीवनाचे अंतिम उद्दिष्ट असून त्यासाठी योगाभ्यासाचा उपदेश केला.

श्रुतींमध्ये जो सर्वात मोठा परमानंद म्हणून वर्णन केला आहे, त्याचा ऋषभदेवांना अखंड अनुभव असे. जीवनाच्या उत्तर भागामध्ये ते जडवत् पृथ्वीवर भ्रमण करीत राहिले. त्यांच्या मुखावर सहज, सुंदर हास्य नित्य खेळत असे. त्यांच्यात किंचितही शरीरभाव नव्हता. ते निरुद्देश विचरण करीत कुटक पर्वतातील एका अरण्यामध्ये पोहोचले. तिथे अरण्यात लागलेल्या वणव्यामध्ये त्यांचा देह अग्निसमर्पित झाला.

**भरत राजाची कथा**

संसारत्याग करण्यापूर्वी भगवान ऋषभदेवांनी आपला ज्येष्ठ पुत्र भरत याला सर्व राज्याचा अधिपती केले होते. भरत राजा राज्य करीत असलेल्या खंडाला पूर्वी 'अजनाभवर्ष' असे नाव होते, पण हा राजा इतका सद्गुणी, धार्मिक, आध्यात्मिक, पराक्रमी, सामर्थ्यवान, आणि जनहितकारक होता, की या अजनाभवर्षाचे नाव बदलून लोक भरत राजा राज्य करीत असलेल्या खंडाला 'भारतवर्ष' म्हणू लागले. सुरुवातीच्या काळात भरताने अत्यंत आदर्श असे कर्मकांड केले. उत्तम राज्यही केले. पण ते राज्य आपल्या पाच मुलांना वाटून देऊन तो पुलाह आश्रमात निघून गेला. तेथील उपवनामध्ये भरत राजा एकांतात एकटा राहत असे. भगवंतांच्या आराधनेतून त्याला परमानंद प्राप्त होत असे. त्रिकाळ स्नान आणि उपासना असे त्याचे दिवस चालले होते. तो भक्तियोगामध्ये रमून गेला होता.

अशामध्ये एकदा तो त्याच्या आश्रमाजवळून वाहणाऱ्या चक्र नदीच्या तीरावर ॐकाराचा जप करीत बसला होता. एवढ्यात तहानेने व्याकूळ झालेली एक हरिणी एकटीच त्या नदीकिनारी आली. ती पाणी पीत असताना सिंहाने केलेल्या भयंकर गर्जनेचा नाद वातावरणात घुमला. सिंहाच्या भीतीने हरिणीने नदीपलीकडे जाण्यासाठी म्हणून उडी मारली.

ही हरिणी गर्भवती होती आणि भीतीचा धक्का आणि एकदम उडी मारणे या दोन्ही गोष्टींच्या योगाने ती प्रसूत झाली. तिचे पाडस नदीच्या प्रवाहामध्ये पडले व हरिणी देह सोडून गेली. हे सर्व भरत ज्या ठिकाणी ॐकार जप करीत बसलेला होता, त्यासमोरच घडले. बिचारे नुकतेच जन्मलेले हरीण पाडस नदीच्या प्रवाहाबरोबर वाहत चालले. ते पाहून भरत राजा तटस्थ राहू शकला नाही. त्याने त्याला त्या प्रवाहातून बाहेर काढले आणि आश्रमामध्ये आणले. हे सर्व अतिशय नैसर्गिकच होते. योगी म्हणजे सहृदय नसणे असे नव्हे. त्या दृष्टीने, भरताने केलेली कृत्ये योग्यच होती.

आश्रमात आणून भरताने त्याचे अगदी बालपणाच्या काळात संरक्षण केले होते. थोडे मोठे झाल्यावर ते हरीण सहजच वनात जाऊन आपल्या कळपात मिसळले असते, पण या ठिकाणी भरत सावध राहिला नव्हता. प्रचंड संपत्ती आणि सत्ता, राज्य हे सर्व सोडून वनात येऊन तप करीत असलेल्या भरताला हे हरीण 'माझे' आहे असे ममत्व निर्माण झाले. त्या हरणाच्या नादाने त्याची उपासना मंदावली. हे हरीण आपल्याला शरण आले आहे आणि त्याचा सर्व भार

आपल्यावर आहे असा भ्रम त्याला निर्माण झाला. ते दृष्टिआड झाल्यावर त्याला त्याची काळजी निर्माण झाली.

ईश्वरआराधनेच्या कर्मापासून हरणामध्ये गुंतलेला भरत एकदा हरणाच्या जवळच असताना त्याला मृत्यूची चाहूल लागली. हरणाकडे पाहत त्याला असे वाटले, माझ्यानंतर याची काळजी कोण घेईल? आणि अशा रीतीने हरणाकडे पाहतच, त्याच्या विचारातच त्याने देह ठेवला. मरणसमयी हरणात आसक्ती राहिल्यामुळे पुढे त्याला हरणाचा जन्म प्राप्त झाला. येथून ही कथा महायोगज्ञानी जडभरताच्या कथेपर्यंत जाते ती कशी, हे आपल्याला पाहायचे आहे.

**ऑनलाईन ध्यानसत्र**

**स्वरूपयोगतर्फे ऑनलाईन ध्यानसत्र (पू. स्वामीजींचे ध्यानपूर्व विवरण रेकॉर्डिंग, ध्यान व उपासना) दर पंधरवड्यातील एका बुधवारी सकाळी ६ ते ७.१५ (भारतीय वेळेनुसार) होईल. मोबाईल किंवा लॅपटॉपवर Zoom app च्या साहाय्याने यात सहभागी होता येईल.**

**: संपर्क :**

**स्वाती दामले ९९३०४७८०७३**

**नीता खिरवाडकर ९८८१०२१९११**

**swaroopyog.conference@gmail.com**

## अभिनंदन



*ऑस्टिन, टेक्सास येथील कु. तन्वी अजय इंगळे ही बारावी इयत्तेत शिकत असून पुढील शिक्षणासाठी तिची नुकतीच University of Texas at Austin-College of Natural Sciences या संस्थेत Dean's Scholar म्हणून निवड झाली आहे. तिने आपल्या शिक्षणासाठी Biochemistry हा विषय निवडला आहे. तन्वी ही श्री.अनंतराव व सौ. जयाताई इंगळे यांचा मुलगा अजय आणि स्वामी माधवानंद व सौ. आशाताई यांच्या मुलीची (पूर्वाश्रमीची हिमगौरी उर्फ रश्मी नगरकर व आता प्रिया इंगळे) मुलगी आहे.*

*यामुळे स्वरूपयोग साधक परिवाराला ही विशेष कौतुकाची बाब आहे. पण त्याहीपेक्षा अमेरिकेत स्थायिक झालेल्या एका महाराष्ट्रीयन कुटुंबातील अस्खलित मराठी बोलणारी ही मुलगी आहे. तिने एवढे मोठे यश मिळवले आहे ही अभिमानाची बाब आहे.*

*ही शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रतिष्ठेची समजली जाते. या शिष्यवृत्तीविषयी संस्थेच्या वेब-साईटवर काय म्हटले आहे ते पाहिलं म्हणजे या शिष्यवृत्तीचं महत्त्व आपल्या लक्षात येईल.*

*Dean's Scholars' is a four-year honors degree program for highly motivated and talented students with a demonstrated interest in scientific research. Students earn a Bachelor of Science honors degree in any of the majors offered by the College of Natural Sciences.*

*Students take smaller courses developed specifically for students and complete an innovative, interdisciplinary curriculum that features more elective hours than standard degree plans. Students receive training in research methods, develop their own research projects, and write theses under the direction of faculty in the College of Natural Sciences.*

*हे वाचलं म्हणजे अगदी स्वामींची नात शोभते असं आपल्या सर्वांच्याच मनात आल्याशिवाय राहत नाही, नाही का?*

**तन्वीला तिच्या पुढील शिक्षणासाठी स्वरूपयोग परिवारातर्फे खूपखूप शुभेच्छा!**

**ती यशाची अशीच उत्तुंग शिखरे पार करत राहो!**

# ‘समाजशिक्षक’ पुरस्कार सोहळा वृत्त

कै. अण्णा तळवलकर मेमोरियल ट्रस्टतर्फे आयोजित १२वा वार्षिक पुरस्कार प्रदान सोहळा रविवार दि. ४ मार्च रोजी सायंकाळी ५.३० ते ८.३० या वेळेत बालशिक्षण मंदिर सभागृह, मयूर कॉलनी, कोथरूड येथे आयोजित करण्यात आला होता. दर वर्षी हा पुरस्कार तीन महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींना दिला जातो.

सरस्वती वंदनेनंतर प्रा. श्री. द. महाजन यांच्या अध्यक्षतेखाली या सोहळ्याची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे स्वरूप सांगून कै. अण्णा तळवलकर यांची ओळख करून देण्यात आली. कै. अण्णा हे Sir Cusrow Wadia Institute of Technology येथे प्राध्यापक (Head of the department of Electronics) म्हणून कार्यरत होते. एक हाडाचा शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांशी घट्ट प्रेमाचं नातं तयार झालेल्या अण्णांच्या निधनानंतर १९८१ मध्ये त्यांच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ अण्णा तळवलकर मेमोरियल ट्रस्ट स्थापन केला आणि त्या ट्रस्टतर्फे गेली ११ वर्षे समाज शिक्षण व इतरही क्षेत्रांत अनेक वर्षे काम करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो.

आनंदाची गोष्ट म्हणजे या वर्षीचा ‘समाजशिक्षक’ हा पुरस्कार आपल्या स्वामीजींना देण्यात आला. स्वामीजींच्या व्यापक कार्याची ओळख करून देणारी एक छोटी documentry दाखवून स्वामीजींचा परिचय करून देण्यात आला.

स्वामीजींनी त्यांच्या प्रबोधनातून त्यांच्या कार्याचे दोन महत्त्वाचे पैलू राष्ट्रीयत्व व आध्यात्मिकता हे आहेत असे सांगितले. भारतीय स्वातंत्र्याचा देदीप्यमान इतिहास, तसेच १८५७च्या भारतीय स्वातंत्र्यसमराचा इतिहास आणि स्वातंत्र्यासाठी जीवन समर्पण केलेल्या क्रांतिकारकांचं जीवनकार्य समाजापर्यंत येणं आवश्यक आहे असं ते म्हणाले. त्याप्रमाणेच लोकमान्य टिळकांची बुद्धिमत्ता, त्यांचा प्रखर राष्ट्रवाद व अजोड देशभक्ती- प्रकट करीत, आध्यात्मिकता व राष्ट्रप्रेम हे एकत्र कसे असतात हे त्यांनी दाखवून दिले. स्वामींच्या प्रबोधनात व्यक्त होणारी आध्यात्मिकता व राष्ट्रभक्ती हे त्यांच्या शिष्यवर्गासाठीच नव्हे तर सर्व श्रोतृवर्गासाठी प्रेरणादायक होते.

‘अनुकरणीय उद्योजक’ हा पुरस्कार महाबळेश्वरचे एक अंध उद्योजक श्री. भावेश भाटिया यांना त्यांच्या पत्नीसह देण्यात आला. बालपणापासून दृष्टिदोष असलेले भावेशजी काही काळाने दृष्टी गमावून बसले पण त्यामुळे त्यांची जिद्द, त्यांच्यातील कणखरपणा, आत्मविश्वास हे अधिकच बळकट झाले. अत्यंत सामान्य परिस्थितीतील भावेशजींच्या याच गुणांकडे आकर्षित झालेल्या श्रीमंत घराण्यातल्या नीताने त्यांना जीवनसाथी म्हणून निवडले. या डोळस तरुणीने त्यांना सर्वतोपरी साथ दिली. खरोखरीच अंधारातून प्रकाशाकडे एकाकी वाटचाल करणाऱ्या या जोडप्याच्या जीवनाचा, त्यांच्या उद्योगाचा थक्क करणारा प्रवास भावेशजींनी आपल्या भाषणातून उलगडला. दारिद्र्य, आईला झालेला असाध्य आजार, उपेक्षा यांच्याशी सामना करीत, आपल्या अंध बांधवांना सोबत घेत त्यांचाही उत्कर्ष घडविला. सनराईज कँडल्स या त्यांच्या उद्योगाचे १४ शहरांत कारखाने आहेत आणि मोठ्या प्रमाणावर निर्यात करणारा, अंध उद्योजक व कामगार यांच्या सहकार्याने चालणारा हा एकमेव उद्योग असावा. २५ कोटींच्या वर उलाढाल असणाऱ्या या उद्योगात त्यांची पत्नी नीता यांची मोलाची साथ आहे. उत्तम वक्तृत्व असलेले भावेशजी उत्कृष्ट अथलेट खेळाडू असून भालाफेक, थाळीफेक, गोळाफेक, धावणे इत्यादी खेळांत त्यांनी अनेक सुवर्णपदकेही पटकावली आहेत.

‘अवनीमित्र’ हा पुरस्कार श्री. नंदू कुलकर्णी यांना दिला गेला. नंदू कुलकर्णी हे निसर्गप्रेमी व्यक्तिमत्त्व आहे. निसर्गप्रेमापोटी ‘कमिन्स इंडिया’सारख्या मोठ्या कंपनीतील नोकरी सोडून त्यांनी उद्यान निर्मिती हा उद्योग सुरू केला. समाजामध्ये निसर्गविषयक जाणिवा वाढाव्यात म्हणून सतत वृत्तपत्रे, मासिके यांतून नंदूजी लिखाण करीत असतात. अतिशय सोप्या आणि घरगुती उपायांतून पाणी बचतीचे महत्त्व पोटतिडकीने सांगत असतात. अनेक ठिकाणी भ्रमंती करून समाजाला पर्यावरण रक्षणाचे, वृक्षलागवडीचे व पाणी बचतीचे महत्त्व पटवून देतात. अनेक मार्ग, युक्त्या सुचवतात. त्यावर लेख, भाषणे या माध्यमातून लोकजागृती घडवतात. हा अवलिया अवनीमित्र तर आहेच पण जगन्मित्रही होऊन गेलाय आणि हजारो लोकांना बरोबर घेत पर्यावरण रक्षणाचे त्यांचे कार्य अखंडपणे चालू आहे. त्याबद्दल त्यांना ‘अवनीमित्र’ या पुरस्काराने गौरविण्यात आले.

शेवटी कै. अण्णा तळवलकर मेमोरियलने ट्रस्टचे संस्थापक व त्यांचे विद्यार्थी श्री. श्रीकांत कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात आपल्या गुरूंचे प्रेरणादायक व्यक्तिमत्त्व, त्यांचे आदर्श, त्यानुसार

**(पुढील मजकूर पृष्ठ क्र. २४ वर...)**

# युवा स्वाध्याय

## 'ध्यान' चिंतन

**सौमित्र पंडित**



**तत्रैकाग्रं मनः कृत्वा**
**यतचित्तेन्द्रियक्रियः ।**
**उपविश्यासने**
**युञ्ज्याद्योगमात्मविशुद्धये ।।**

आसन पक्कं करून, मन एकाग्र करून इंद्रियांना ताब्यात आणायचं आणि मन योगातून शुद्ध करायचं. पण हा योग म्हणजे काय? पतंजली उत्तर देतात, 'योगश्चित्तवृत्ति निरोधः।' आता म्हणायला इतकं अवघड तर करायला किती अवघड असेल! Yog is restraining the mind stuff from taking various forms. (योग म्हणजे चित्तातील वृत्तींना इकडेतिकडे जाण्यापासून थांबवणे.) वृत्ती या शब्दाचा एक अर्थ वादळ असा होतो, आणि नैसर्गिक वृत्तींसारख्याच मनातील वृत्तीही आपल्याला त्यांच्याबरोबर घेऊन जातात. या वृत्तींना under control आणायचं, मन एकाग्र करायचं, आसन नीट असलं पाहिजे, श्वासोच्छ्वास नीट चालला पाहिजे, सगळ्यांशी व्यवस्थित वागायचं, कुणालाही (तो कितीही आवडत नसला तरी) दुखवायचं नाही आणि या सगळ्यात वाट्टेल ते खायचं नाही, या कुठल्या demands आहेत राजयोगाच्या? हे सगळं करायच्या ऐवजी मला तुरुंग परवडेल! आणि तशी खरंच गरज काय आहे ध्यानाची?

प्रत्येक माणसाच्या जीवनात त्याच्या विचारांना विशेष महत्त्व असतं. चांगले, वाईट, वेगवेगळ्या चवींचे विचार अखंडपणे येतात आणि जातात. त्या विचारांना कोणीही बोलावलेलं नसतं आणि कोणी घालवतही नसतं. ते विचार कुठून येतात आणि कुठे जातात हेही आपल्याला माहिति नाही. आपला पुढचा विचार कुठला असेल हेही आपल्याला कळणं अशक्य आहे. प्रयत्न करून बघा तुम्हीच. आपण कधी याचाही विचार करत नाही की विचारांना कसं कळतं, की काय विचार करायचाय? आणि तरी तुमच्या लक्षात येईल की आपण प्रत्येक विचार अगदी seriously घेऊन चालतो. विचारांची default value ही truth pointवरच सेट असते. तुमचा खरंच विचारांवर ताबा आहे, का हा ताबा असणं हासुद्धा एक विचारच आहे? या सर्व गोष्टी जेव्हा मनात आल्या तेव्हा मी घाबरलो. माझा खरंच किती कमी कंट्रोल आहे माझ्या जीवनावर, असं मला वाटलं. कारण तोपर्यंत विचार सांगतो तीच पूर्व दिशा असायची. मी आत्तापर्यंत केलेल्या किंवा न केलेल्या गोष्टी, माझे decisions, माझ्या amcitions, माझ्या आवडी-निवडी आणि ultimately मी हाही एक विचारच आहे हे मला कळलं. या विचारांवर मी विश्वास ठेवू शकतो का, हे विचार important तरी आहेत का, यांची गरज काय आहे, यांच्याशिवाय मी function करू शकतो का, यांच्याशिवाय माझी identity काय आहे, Who am I in the acsence of these thoughts (हे विचारच नसतील तर मी म्हणजे कोण)? असे अनेक प्रश्न मनाला छळू लागले. 'स्वतःसाठी उत्तम खड्डा खणला आहेस सौमित्र, शाब्बास!' असासुद्धा विचार आला आणि मग अजून एक विचार आला. हे विचार जर खरंच महत्त्वाचे नसतील तर मग त्रास का होतोय? मनाला जे अस्वस्थ करत होतं ते एकदम शांत झालं. कारण मला त्रास होतोय हाही एक विचारच होता. जो त्रास होत होता तो म्हटलं तरच होता, नाही तर शांतताच होती.

हळूहळू माझ्या लक्षात आलं की thoughts are just suggestions. त्यांना intrinsic value किंवा त्यांचं उपजत

**• कै. दत्तात्रय प्रधान यांच्या स्मरणार्थ पृष्ठप्रायोजन •**

मूल्य हे शून्यच असतं. आपण या विचारांना जेवढं महत्त्वाचं बनवतो तितके ते महत्त्वाचे बनतात. त्यांना फक्त assigned value असते- आपण देऊ तेवढीच त्यांची किंमत असते. माझ्या लक्षात आलं की मी खड्डा खणला नव्हता, खाण खणली होती. आपण उगाच गोष्टी complicate करतो असं वाटलं. विचार म्हणतो हे कर म्हणजे आनंदी होशील आणि मी ते गाढवासारखं करायचो. आपण जरी politically free-कायद्याने स्वतंत्र असलो तरी mentally या विचारांचे गुलामच आहोत हेही समजलं. पण ही गुलामगिरी आपण voluntarily स्वीकारली आहे याचं सर्वात जास्त आश्चर्य वाटलं.

या गुलामीतून सुटायचं कसं? तेव्हा ध्यानाचं महत्त्व एकदम लक्षात आलं. मला जर ध्यानाची process stagesमध्ये समजायची असेल तर ती मी अशी करीन- विचार, मी विचार करतोय, मी आणि विचार, आणि मग शेवटी शुद्ध मी. राजयोगामध्ये अष्टांगे असतातच, पण या श्लोकानुसार साधकाचे यम, नियम, आसन, प्राणायाम हे सगळं होऊन नंतर तो बिचारा finally प्रत्याहार आणि धारणा attempt करतो असं मला वाटलं.

मी initially जेव्हा ध्यान करायला लागलो तेव्हा ध्यान कमी आणि चिडचिड जास्त व्हायची. कारण विचार शेपटीला आग लावल्यासारखे मनाची लंका जाळत असायचे. प्रत्येक meditation sessionचा शेवट frustrationमध्ये व्हायचा. बऱ्याच वेळेला मी 'गेलं खड्ड्यात!' म्हणून ध्यान करणं सोडणारही होतो. पण नशिबाने एकदा ध्यान करताना distract झालो, रागदेखील आला, आणि मग विचार आला- तू distract झालास हे कोणाला कळलं? मन जर विचारामध्ये व्यस्त होतं तर मग मनाला तर कळू शकत नाही, की ते distracted आहे. स्वामीजींनी सांगितलेला जो मी आहे त्यालाच हे कळलेलं असणार! मग मी माझ्या meditationची strategy बदलली. फोकस करायच्या ऐवजी फोकस जातोय का, हे मी बघायला लागलो. विवेकानंदांनी राजयोगामध्ये सांगितलं आहे की पहिले काही महिने नुसतं विचार येताना आणि जाताना बघा. त्यांच्या त्या वाक्याचं महत्त्व मला या प्रॅक्टिसमध्ये कळलं. त्यांच्या वाक्यामागे एक खूप strong scientific caseसुद्धा आहे.

मध्यंतरी मी addiction या विषयाचा अभ्यास केला होता. तुम्हांला माहिती आहे का की addiction कसं होतं? माणसाला व्यसन कसं लागतं? मेंदूमध्ये काही neurotransmitters असतात. या neurotransmittersमुळे आपला मूड बदलतो. काही neurotransmittersमुळे आपल्याला pleasuracle feel होतं- छान वाटतं. ड्रग्जचं structure या pleasure giving neurotransmittersसारखंच असतं. आपल्या मेंदूमध्ये जाऊन ते या pleasure giving neurotransmittersना mimic करतात आणि माणसाला बरं वाटतं. पण प्रॉब्लेम तो नसतो. सतत आणि पुन्हा पुन्हा हे ड्रग घेत राहिल्यास मेंदू हे pleasure giving neurotransmitters स्वतः बनवणं बंद करतो आणि माणूस कुठल्याही चांगल्या feelingसाठी या ड्रगवर पूर्णपणे अवलंबून राहायला लागतो. मग अशा माणसाला हे addiction काढण्यासाठी rehabilitation centreमध्ये टाकतात. मला आधी वाटायचं की rehab centreमध्ये लोकांना बांधून टाकत असतील आणि त्यांची नशा काढत असतील. पण तसं नाही करत. तिकडे त्या पेशंटना रिहॅबवालेच कमी कमी डोसेजमध्ये ड्रग देतात. कारण एकदम ड्रग बंद केले तर खूप त्रास होतो. वेड लागू शकतं.

मेडिटेशनचे पहिले काही दिवस या विचार नामक ड्रगसाठीचं rehabilitation असतं. कमी कमी प्रमाणात विचार देऊन त्यांच्यावरची dependency हळूहळू नष्ट होते. मनात एखादा विचार आला की त्या विचाराला काढण्यासाठीसुद्धा दुसरा एक विचारच लागतो. मनाला मनाने हरवता येत नाही. मनाला फक्त शांततेने हरवता येतं. पण मग अजून एक प्रश्न उठतो. ही शांतता कशी प्राप्त होईल? स्वामीजींनी श्वासाला जोडून सोऽहं ध्यान करायला सांगितलंय. या ध्यानाची exact speciality काय आहे हे जाणून घेण्यासाठी मी खूप विचार केला, पण व्यर्थ! मग एके दिवशी ध्यान करतानाच उत्तर कळलं. श्वासोच्छ्वास ही एक semi-voluntary process असते. म्हणजे आपलं लक्ष नसतानाही ती चालू असते, पण आपण लक्ष देऊन ती बदलूही शकतो. स्वामीजींनी स्पष्ट सांगितलं आहे की श्वासोच्छ्वासाकडे नुसतं बघायचं आहे. त्याच्याकडे benign attention द्यायचं आहे. Benign means non-aggressive and non-

• कै. कमलाकर देशपांडे यांच्या स्मरणार्थ पृष्ठप्रायोजन •

controlling- विचारांना बदलण्याचा प्रयत्न न करता नुसतं लक्ष देणं. असं केल्यावर श्वास आपोआप शांत होतात. पण तोपर्यंत माझ्या हे लक्षात आलं नव्हतं की thinking is also a semi-voluntary process.

सोऽहं ध्यान केल्याने कोणत्याही गोष्टीवर benign attention ठेवण्याची क्षमता विकसित होते. मग आपण येणाऱ्या व त्रास न देता निघून जाणाऱ्या विचारांकडे बघू शकतो. Benign attention जसं develop होऊ लागलं तसे ध्यानातील अजून काही बारकावे लक्षात आले. आता मनातले विचार जरी आक्रमक नसले तरी लक्ष वेधणारे होते. विचारांच्या नेचरवर मेडिटेशन केल्यावर माझ्या लक्षात आलं की प्रत्येक विचाराला एक internal किंवा external stimulus असतो. पाच senses असतात असं आपण म्हणतो. Sight, sense, touch, smell and sound- रूप, रस, स्पर्श, गंध आणि शब्द. आपले विचारही आपल्याला याच पाचांतून कळतात. खरं तर आपला पूर्ण experience हा एक sensory input based experience असतो. आपला सगळ्यांचा ego किंवा personality self हा या सर्व sensory inputsचा residual product आहे असं मला वाटलं.

माझ्या असंही लक्षात आलं की आपल्या experienceमध्ये अजून एक factor आहे, जो इतका सूक्ष्म आहे की त्याला आपण बऱ्याच वेळेला overlook करतो. हा factor आहे knowledgeचा, ज्ञानाचा. मी conventional cook cased knowledge म्हणत नाही आहे. मी प्रत्येक माणसाला असलेल्या जाणिवेबद्दल बोलतोय- about knowing your Self. ही जाण आपल्या आयुष्यात अतिशय central असते. कारण नुसते sensory inputs असले पण जाण नसली तर experience होऊ शकत नाही, पण कुठलाही sensory input नसतानाही जाण असते. Under such conditions, when there is no experience, pure knowing can arise.

योग साध्य होण्याआधी योग नसल्याची कल्पना जावी लागते. Personality self जरी पूर्णपणे नाहीसा होत नसला तरी personality selfशी पूर्ण associationसुद्धा नसतं- या अवस्थेमध्ये जरी पूर्ण शांतता नसली तरी आवाजदेखील नसतो. याचं कारण म्हणजे मी इकडे असतो आणि विचार तिकडे असतात. पूर्ण दिवस चाललेला टीव्ही finally mute केल्यावर जसं बरं वाटतं तसंच. मनाच्या या सतत चाललेल्या कॉमेंट्रीमधून डोकं बाहेर काढल्यावर एका वेगळ्या लेव्हलच्या awarenessच्या existenceची जाणीव होते. तो कायमच होता. पण आता त्याला आपण acknowledge करू लागलो आहोत. हा awareness परका नसतो. 'स्व'चा experience concentrate केल्यासारखा तो वाटतो. याच 'मी'वर स्वामीजी आपल्याला अवधान म्हणजे benign attention ठेवायला सांगतात. या स्टेजच्या पलीकडे मी गेलो नाही. म्हणून मी अजून या विषयावर बोलू शकत नाही. स्वामीजींनी सांगितलेल्या गोष्टी करूनच या inner silenceचा मला अगदी छोटा preview मिळाला. यापलीकडे काय होतं हे फक्त स्वामीजीच सांगू शकतात.

## अभिनंदन



*पुणे युवा केंद्रातील कु. रसिका वझे हिला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून एम्.ए. संस्कृत करताना 'वेद' या विशेष विषयात मिळवलेल्या प्राविण्याबद्दल 'कै. वेदमहर्षी विनायकभट्ट घैसास गुरुजी सुवर्णपदक' मिळाले.*

*रसिका ही स्वरूपयोगचे मूळचे गोव्याचे आणि आता पुण्याचे कार्यकर्ते श्री. सदाशिव व सौ. नंदिता वझे यांची कन्या. अगदी लहानपणापासून ती स्वरूपयोग परिवारात बाल, किशोर या अवस्था पार करीत, स्वरूपयोगच्या मुशीत स्वामींच्या मार्गदर्शनाखाली घडत घडत आता युवा केंद्राची सदस्या आहे. नेहमी उत्साहाने व उत्तम स्वाध्याय करणारी रसिका स्वरूपयोगच्या कार्यक्रमात गाणारी एक युवा गायिका म्हणूनही सर्वांना परिचित आहे. अभिनंदन!*

**शैक्षणिक क्षेत्रात मिळवलेल्या स्पृहणीय यशाबद्दल स्वरूपयोग परिवारातर्फे रसिकाचे अभिनंदन!**

# १८५७चे स्वातंत्र्यसमर

शिल्पा भालेराव



१८५७ चे स्वातंत्र्यसमर या विषयावर आज स्वाध्याय करणार आहे. प्रथम आपण त्याची पार्श्वभूमी समजून घेऊ. **हा सर्व देशव्यापी उठाव होता.**

हे युद्ध त्या वेळचा परकीय शत्रू इंग्रज याच्याविरुद्ध सर्व भारतीयांनी धर्म, जात बाजूला ठेवून एकत्रितपणे पुकारलेलं होतं. हे युद्ध स्वधर्म आणि स्वराज्य या दिव्य तत्त्वांवर आधारलेलं होतं. इंग्रजांनी अत्यंत अन्याय्य पद्धतीने भारतातील राज्ये खालसा करायला सुरुवात केली. राजघराण्यातल्या व्यक्तींची विटंबना सुरू केली. आधी केलेले काही तह नामंजूर केले. काही तहांमधील आपल्याला हव्या त्या गोष्टी ठेवल्या, बाकी गोष्टी फेटाळून लावल्या. काडतुसांचे केवळ निमित्तमात्र होऊन संपूर्ण देश स्वातंत्र्ययुद्धात सहभागी झाला. या युद्धाचे बेत रंगो बापूजी व अझिमुल्ला खान या अत्यंत धुरंधर, हुशार व्यक्तींनी केले होते. श्रीमंत नानासाहेब पेशवे, झाशीची राणी लक्ष्मीबाई या त्यात भाग घेणाऱ्या काही महत्त्वाच्या व्यक्ती आहेत. अनेक गुप्त संघटना निर्माण झाल्या. पुरुष, स्त्रिया कुणीही मागे राहिले नाहीत. मंगल पांडे यांच्या बलिदानाने या समराला तोंड फुटले. मीरत, दिल्ली, पंजाब, अलीगड, नसीराबाद, रोहिलखंड (राजधानी- बरेली), बनारस अशा सर्व ठिकाणी प्रचंड उठाव झाले. अशी अनेक शहरे इंग्रजमुक्त केली गेली. या लढायांमध्ये मारलेल्या मूठभर इंग्रजांच्या हत्येचा सूड आणि युद्ध मोडून काढण्यासाठी इंग्रजांनी अनन्वित अत्याचार आणि नेटीव्हांच्या प्रचंड कत्तली करण्याचे सत्र चालू केले. तोफेच्या तोंडी देणे, सार्वजनिक रीत्या जाहीरपणे फाशी देणे, हिंदूंच्या तोंडात फासावर लटकले असताना गायीचे मांस चेचून कोंबणे- हे किरकोळ प्रकार होतेच. पण त्यांच्या डोक्यावरचे केस तडतड तोडणे, त्यांच्या शरीरात बायोनेटाच्या टोकांनी आरपार भोके पाडणे इत्यादी क्रूर प्रकार चालू होते.

हे युद्ध ठेचून काढण्यासाठी इंग्रजांनी काय केलं त्याचं बनारसमधलं एक उदाहरण. इंग्रजांनी लहान लहान खेडेगावांमध्ये युरोपियन्स व शीख लोकांच्या टोळ्या धाडल्या. त्यांनी दिसेल त्याला कापून टाकणे किंवा फाशी देणे हे सत्र चालू केलं. काळे लोक संख्येने प्रचंड होते. तेव्हा इंग्रजांनी गावंच्या गावं पेटवून द्यायला सुरुवात केली. त्या आगीतून कुणी बाहेर पडलंच तर त्याला ते गोळ्या घालून ठार करीत. या भयंकर हकिकती इतिहासातून पुसून टाकण्यासाठी खुद्द 'के' हा प्रमुख इंग्रज लेखक म्हणतो, 'जरी मजपुढे इंग्रजांनी केलेल्या भयंकर व क्रूर जाचाचे वर्णन केलेली मुबलक पत्रे पडलेली आहेत, तरी हा विषय जगापुढे नसावा, म्हणून मी त्याबद्दल एक अक्षरही लिहीत नाही.' असला हा इतिहासकार!

अलाहाबाद येथे अकबराच्या काळातील एक भव्य किल्ला आहे. कोलकता, पंजाब, दिल्ली वगैरे ठिकाणी जाणाऱ्या सर्व रस्त्यांचे अलाहाबाद हे जणू नाक आहे, असं सावरकरजी म्हणतात. १८५७मध्ये ज्याचं या किल्ल्यावर स्वामित्व असेल त्याच्या हातात अलाहाबाद राहील अशी स्थिती होती. ते मिळवण्याचे दोघांचेही म्हणजे हिंदुस्थानी व इंग्रज यांचे प्रयत्न चालू होते.

अलाहाबादमध्ये शिपायांबरोबरच सगळ्या शहरानेही बंड करून उठावे असा क्रांतिपक्षाचा बेत होता. त्यासाठी ज्या काही गुप्तरचना करण्यात आल्या, त्यांत हिंदू व इस्लाम या दोन्ही धर्मांच्या धर्मगुरूंनी देशाच्या मुक्ततेचे बीज सामान्य जनांच्या मनात रुजवण्याचे काम केले.

अलाहाबादच्या किल्ल्याचं महत्त्व बघता त्याचा कडेकोट बंदोबस्त असणं अपेक्षित होतं. पण देशात कुठे उठाव होत आहेत, काय रणधुमाळी माजत आहे याचं वृत्त त्यांच्यापर्यंत पोचत नव्हतं. त्यामुळे ते निवांत होते. जेव्हा मीरतच्या इंग्रजांच्या पराभवाची बातमी आली तेव्हा अलाहाबादसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी शिपायांची सहावी रेजिमेंट आणि शिखांच्या फिरोजपूर रेजिमेंटचे दोनशे

लोक इतकंच सैन्य होतं. अयोध्येहून घोडेस्वारही आले. तो किल्ला, तेथील सगळी शस्त्रसामग्री या नेटीव्हांच्याच ताब्यात दिली गेली. तिथल्या इंग्रजांचाही या शिपायांच्या राजनिष्ठेवर भरवसा होता. खास करून सहाव्या रेजिमेंटने युद्धनीतीची कमाल केली. त्यांनी दिल्लीहून येणाऱ्या बातम्या ऐकून सरकारला अशा अर्थाचा निरोप धाडला, की आम्ही बंडखोरांचा जीव घेतो. तुम्ही आम्हांला हुकूम द्या.

याची खूप तारीफ झाली. खुद्द गव्हर्नर जनरलकडून या राजनिष्ठेबद्दल सहाव्या रेजिमेंटचे सार्वजनिक आभार मानण्याचा हुकूम देण्यात आला. इतक्यात कुण्या नागरिकाने बातमी दिली की ही रेजिमेंट फितूर आहे. लगेच या रेजिमेंटने दोन क्रांतिदूतांना अधिकाऱ्याच्या स्वाधीन केले आणि आमची अजून परीक्षा घ्या असेही आवाहन केले.

बनारसकडून बंडवाले येत आहेत या बातमीने शहरात गोंधळ उडाला. इंग्रजांनी बनारसकडून येणाऱ्या पुलावर काही तोफा रोखून ठेवायला सांगितल्या आणि सगळे ऑफिसर्स मेसमध्ये जेवायला गेले. तेव्हा त्या तोफा पुलाकडे न नेता कँटोन्मेंटकडे न्याव्यात असा हुकूम शिपायांनीच सोडला. हे कळताच लेफ्टनंट अलेक्झांडर व लेफ्टनंट हॉवर्डने अयोध्येहून मागवलेल्या हजार घोडेस्वारांसह या नेटीव्ह शिपायांवर हल्ला केला. आणि अचानक त्या घोडेस्वारांनी आपल्या स्वकीयांवर शस्त्र उगारायला नकार दिला. अलेक्झांडर मारला गेला. सर्व शिपाई आनंदाने त्या तोफांसह कँपकडे जात असताना मेसमध्ये बरेच इंग्रज आलेले पाहून हल्ला चढवला गेला. सर्व इंग्रज कापले गेले.

अलाहाबादचा किल्ला शिखांच्या ताब्यात होता. ते शीख शिपाई आपल्यालाच सामील होतील अशी सर्व शिपायांना आशा वाटू लागली. पण खेदाची गोष्ट अशी की त्या शीख शिपायांनी मात्र इंग्रजांप्रती राजनिष्ठा दाखवली. त्यासाठी किल्ल्यातील इतर हिंदी शिपायांनी वारंवार बंड केले तरी त्यांना निःशस्त्र करून किल्ल्यातून बाहेर हुसकावून लावले गेले आणि किल्ला इंग्रजांकडेच राहिला.

अलाहाबादमधल्या शिपायांनी बंड केलं. अलाहाबाद शहरही पेटून उठलं. शहरात नाकेबंदी करून शिपाई व नागरिक यांनी मिळून तुरुंग फोडला. मनात असंतोष धुमसत असलेले कैदी आधी युरोपियन वस्त्यांकडे गेले. त्यांनी रेल्वेची ऑफिसं, रूळ, तारेचे खांब, रेल्वे इंजिने यांची पार मोडतोड केली. दिसेल त्या गोऱ्यांची कत्तल केली. त्यानंतर युरोपियन्स नसलेल्या पण गोऱ्यांचे लांगूलचालन करणाऱ्या लोकांना लक्ष्य केले. ७ जूनला सकाळी अलाहाबादचा ३० लाखांचा खजिना बंडवाल्यांनी ताब्यात घेतला. शहर आणि किल्ला परिसरात बंड झाले. त्याच दिवशी अख्खा अलाहाबाद प्रांत पेटून उठला.

अलाहाबादमध्ये मुस्लिमांची संख्या जास्त होती. हिंदू व मुस्लीम या दोघांत एकी होऊन ते आपल्याविरुद्ध उठतील हे इंग्रजांना अशक्य वाटत होतं. तरुण, वृद्ध, दुकानदार, बनिये, मारवाडी, शेतकरी हे सगळे इंग्रजांच्या विरोधात उठले.

ही क्रांती घडली. अचानक परकीय सत्ता नाहीशी झाली, तेव्हा त्याचा फायदा घेऊन काही पिढीजात दरिद्री व हिंदू-मुसलमानात भांडणं, काही गैरसमज यांचा उद्रेक झाला. लुटालूट, जाळपोळ हे प्रकारही झाले. पण सावरकरजी लिहितात तसं हे होणारच होतं. त्यांच्याच भाषेत 'ज्याला राज्यक्रांत्या हव्या असतील त्याला ही संकटे वाटेत बहुधा गाठायचीच!' ते म्हणतात, 'फ्रेंच राज्यक्रांतीशी जर तुलना करून पहिले तर अंदाधुंदी, अत्याचार, लुटालूट, गोंधळ हे १८५७च्या वेळी बरेच कमी प्रमाणात घडले आणि पहिल्या आठवड्यातच हे सगळं कमी होत क्रांतीला आकार आला.'

मौलवी लियाकत अली यांना नेतृत्वपद मिळालं. ते कट्टर देशभक्त होते. विणकर लोकांचे धर्मगुरू होते. त्यांच्या सज्जनतेवर लोकांचा विश्वास होता. मौलवी लियाकत अली यांचे अलाहाबादचा किल्ला काबीज करण्यासाठी हाताखालच्या सैन्याची जमवाजमव करण्याचे प्रयत्न चालू होते. अजूनही त्या चारशे शिखांच्या मनात असतं तर तोफा, शस्त्रे, दारूगोळा यांच्यासह तो किल्ला बंडवाल्यांच्या ताब्यात आला असता. परंतु जनरल नील रात्रीचा दिवस करून अलाहाबादला पोचला. किल्ल्यावर इंग्रजी निशाण फडकलं. ताबडतोब त्याने आपल्या सोबतचं युरोपियन सैन्य किल्ल्याच्या संरक्षणासाठी ठेवलं आणि त्या राजनिष्ठ

◆ सून सौ. आर्या आदित्य रेखी (१९ मार्च) हिच्या वाढदिवसानिमित्त आई-बाबांकडून शुभेच्छा! ◆

शिखांना बाहेर लढाईसाठी पाठवलं. शिखांनी एवढं होऊनही बंडवाल्यांना मिळण्याचं नाकारलं. ते नीलसोबत आजूबाजूच्या गावांची राखरांगोळी करायला तयार झाले. १७ जूनला इंग्रजी सैन्य शहरात घुसू लागलं. म्हणून मौलवी आपल्या अनुयायांसोबत कानपूरला निघून गेले. १८ जूनला इंग्रजांनी त्या चारशे शिखांसह पुन्हा शहरप्रवेश केला.

अशा प्रकारे अलाहाबाद फिरून पुन्हा इंग्रजांच्या हाती पडलं. तरी बंडवाल्यांनी एकेका खेड्याची गढी करून ती लढवायचा प्रयत्न सुरू केला. जनरल नीलने असे लहान पुढारी पकडून देण्यासाठी बक्षिसं लावली. पण त्या वेळी जनतेची बंडखोरांसाठीची निष्ठा अजब होती. अलाहाबादचा किल्ला मिळाला पण इंग्रजांचे अतिशय हाल झाले. त्यांना गाड्या, औषधे, आजारी सैनिकांच्या डोल्या उचलायला माणसं मिळेनात. उष्णतेच्या आणि उपासमारीच्या त्रासाने इंग्रजांना कॉलरा होऊ लागला. सगळी बेशिस्त माजली.

जनरल नीलने बनारस आणि अलाहाबाद इथे कत्तलीचा जणू कारखाना उभारला. सावरकरजी म्हणतात, ५७ साली अख्ख्या हिंदुस्थानात जेवढे इंग्रज, त्यांच्या स्त्रिया, मुले यांचे खून पडले, त्यापेक्षा जास्त खून नीलने एकट्या अलाहाबादेत केले. आणि असे हजारो नील हजारो गावी नेटीव्हांच्या कत्तली उडवत होते. इंग्रजांच्या एकेका माणसासाठी भारतीयांचे एकेक गाव जाळलं गेलं आहे.आणि इंग्रजी इतिहासकारांनी त्याला पवित्र कार्य असंही संबोधलं आहे. हे सगळं आपल्याला वाचवतही नाही, जे आपल्याच लोकांनी सहन केलं आहे.

१८५७ चे स्वातंत्र्यसमर यावर स्वाध्याय करायचा आहे असा मेसेज आला, तेव्हा हो म्हणताना पोटात प्रचंड गोळा होता. कारण हा अभ्यास करताना प्रचंड अस्वस्थता येते. ही अस्वस्थता चॅनेलाइज करता येत नाही आणि सहनही करता येत नाही. आपण एन्जॉय करत असलेल्या स्वातंत्र्याची काय किंमत जुन्या पिढीने मोजली आहे हे पाहून डोळे पांढरे होतात.

या स्वाध्यायातून आणखी एक पैलू सापडला- आपल्याकडचे नेते! लीडरशिप स्किल्स ही बाहेरच्या देशातून शिकायची किमान आपल्याला गरज नाही. आपल्या जुन्या नेत्यांचा अभ्यास केला तरी पुष्कळ आहे.

भारताला स्वातंत्र्य कसं मिळालं हे जे शाळेत हल्ली शिकवतात ना, ती पद्धत आणि माहिती या दोघांनाही चॅलेंज करावं वाटतंय मला! या क्रांतीचा कुठेच उल्लेख का नसतो? आणि भलतेच का येऊन लाटतात हे श्रेय? हे दोन नवीन प्रश्न निर्माण झालेत आणि ते खूप छळत आहेत. उत्तरं कुणीच देऊ शकत नाहीये आणि मला शोधताही येत नाहीयेत. या प्रश्नाची उत्तरं आहेत का? कोण देऊ शकेल ती?

## अभिनंदन



*'स्वरूपयोग'च्या मागील (जाने-मार्च) या अंकामध्ये मुलुंड येथील SKKES या शाळेत नववीत शिकणाऱ्या रम्या अमित पटेल हिने वेट लिफ्टिंगमध्ये मिळविलेल्या यशाची बातमी दिली होती.*

*शालेय वेट लिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदक, मुंबई डिव्हिजन स्पर्धेत सुवर्णपदक आणि ऑक्टोबर २०१७ मध्ये सांगली येथे झालेल्या ८६ किलो वजन उचलून रम्या राष्ट्रस्तरीय स्पर्धेसाठी निवडली गेली.*

*डिसेंबरमध्ये गोहत्ती येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत ९१ किलो वजन उचलून रम्या ५व्या क्रमांकावर आली. या तिच्या परफॉर्मन्सवरून पहिल्या 'खेलो इंडिया स्कूल गेम्स'साठी तसेच, राष्ट्रीय स्तरावरील वेट लिफ्टिंग स्पर्धेसाठी 'मुंबई' विभागातून ती एकमेव स्पर्धक ठरली.*

*फेब्रुवारी २०१८ मध्ये दिल्ली येथे झालेल्या स्पर्धेत रम्याने ९४ किलो वजन उचलले.*

**स्वरूपयोग परिवारातर्फे रम्याचे अभिनंदन!**
**पुढील यशासाठी शुभेच्छा!**

**• कै. उमाकांत शांताराम कामतेकर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ (११ एप्रिल) बहिणीकडून पृष्ठप्रायोजन •**

# १८५७चे स्वातंत्र्यसमर - शिल्पा भालेरावच्या स्वाध्यायावर स्वामींचे विवेचन

**शब्दांकन- सौ. आशा नगरकर**

स्वाध्याय छान, अप्रतिम. यात तीन गोष्टी शिल्पाने मांडल्या, त्या अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

१. १८५७मधल्या समरामागची एतद्देशीयांची म्हणजे नेटीव्हांची वीरश्री आणि राष्ट्रप्रेम.

२. सत्ता मिळवणे, टिकवणे यांसाठी इंग्रजांनी दाखवलेलं क्रौर्य; त्यांना तसंच ट्रेनिंग मिळालं होतं. त्याविरुद्ध संस्कृतीचा उदात्त प्रभाव असलेला आपल्याला मिळालेला वारसा- यांतला फरक.

३. आपल्या लोकांमध्ये बुद्धिमत्तेचा अभाव नव्हताच. अनेक वेळा त्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही विजय मिळवला हे पॉझिटीव्हली मांडलं गेलं. पण हे फारसं कुठे प्रकाशित न झाल्याने इंग्रजांनी जे आणि जसं प्रसृत केलं त्याला १८५७चं बंड असंच म्हटलं गेलं. इतिहासातही त्याची तशीच नोंद झाली कारण राज्यकर्ते इंग्रज होते, आणि त्यांचा शब्द प्रमाण होता. मात्र स्वातंत्र्यवीर सावरकरांनी त्याचा उल्लेख प्रथमच '१८५७चे स्वातंत्र्यसमर' असा गौरवाने केला व नंतर त्या युद्धाचं अथवा उठावाचं तेच नाव रूढ झालं.

१८५७ साली जे काही घडलं ते केवळ शिपायांचं बंड नव्हतं तर भारतभर पसरलेला तो एक वणवा होता- राष्ट्रप्रेमाचा. स्वातंत्र्याच्या अदम्य प्रेरणेने हिंदुस्थानातील सारे शिपाई, सैन्यच नव्हे तर सामान्य नागरिकही पेटून उठले होते. स्वेच्छेने त्या 'बंडात' सामील झाले. त्यांनी इंग्रजांना सहकार्य करण्याचं नाकारलं एवढंच नाही तर सळो की पळो करून सोडलं, इंग्रजांना घरदार, गावं, शहरं सोडून पळून जाणं भाग पाडलं. काही चिडलेल्या, संतापलेल्या शिपायांनी तर त्यांच्या कत्तलीही केल्या.

आजकाल वाचन प्रवृत्ती कमी होत चालली आहे. आत्ताच्या पिढीमध्ये तर जे काय वाचलं, पाहिलं जातं ते कॉम्प्युटरवर. तेही सलगपणे नसतंच. हातात पुस्तक घेऊन वाचन- त्याचं आस्वादन हे फारसं दिसत नाही. थोडासा वेळ आहे तर ही साईट पाहा, नाही आवडलं तर दुसरीकडे पाहा असं डिस्ट्रॅक्शन खूप प्रमाणात होतं. एखादं पुस्तक घेऊन त्याचा सलग अभ्यास हे जवळजवळ दुरापास्तच झालंय.

'१८५७चे स्वातंत्र्यसमर' हे स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या काळातलं पुस्तक! अनेक देशभक्त किंवा सावरकरप्रेमींनी ते वाचलं, अभ्यासही केला, पण तो काही वर्षांपूर्वी. पण आताची ही तुमची पिढी आणि यापुढच्या पिढ्या यांचं काय? त्यांच्यासाठी आम्ही काय करणार आहोत? तर पुढच्या पिढीसाठी आम्ही मटेरियल तयार करणार आहोत. त्या दृष्टीने शिल्पाचा हा स्वाध्याय आयडियल होता.

पराभव झाला, त्यासाठी अनेकांनी प्राण वेचले, पण त्यामागची प्रेरणा पवित्र होती, या गोष्टींचा विचार व्हायला हवा. यश मिळालं नाही, लाखोंचे प्राण गेले याचं कारण म्हणजे इंग्रजांची शिस्त, त्यांनी राज्यकर्ते म्हणून मिळवलेलं ट्रेनिंग, त्यांचं प्लानिंग, एक्झिक्युशन अशा अनेक गोष्टी. तसंच आपल्याकडे या साऱ्या गोष्टींचा असलेला अभाव या गोष्टी या पराभवामागे आहेत, हे समजून घ्यायलाच पाहिजे. त्यातून शिकलं पाहिजे. अर्थातच मुळात या उठावामागे असलेल्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या प्रेरणा, त्यांचं स्वातंत्र्यप्रेम निग्लेक्ट करता येणार नाही. आजवर जगात जिथे जिथे स्वातंत्र्य मिळवण्याचे प्रयत्न झाले त्यांचं स्वरूप एकच होतं. योद्धे एकाच भावनेने प्रेरित होऊन आपलं सर्वस्व पणाला लावतात. ते म्हणजे राष्ट्रप्रेम. स्वातंत्र्याची आकांक्षा. इटलीत हेच घडलं. त्यांचा नेता मॅझिनी याचं चरित्र वाचताना जाणवतं की, 'अरे! हे सगळं अध्यात्मच आहे.' आध्यात्मिक माणूस होता तो आणि त्याची देवता- स्वातंत्र्यदेवता! हेच लक्षात घेऊन सावरकरांनी मॅझिनीच्या आत्मचरित्राचं भाषांतर केलं आणि त्याची प्रस्तावना लिहिली. त्यावर मी एकदा स्वाध्याय केलाय. ही प्रस्तावनाच इतकी जळजळीत होती की त्यावर ब्रिटिश सरकारने बंदी घातली. याचं कारण म्हणजे त्यात स्वातंत्र्यलढ्याच्या, क्रांतीच्या प्रेरणा होत्या. गुळमुळीत राहू नका, स्वातंत्र्यासाठी झगडा, लढा द्या- अशा प्रेरणा देणारं मॅझिनीचं चरित्र. त्यांच्या बाबतीत, इटलीच्या स्वातंत्र्यलढ्यात काय घडलं, त्या नेत्यांनी तेव्हा काय केलं हे सगळं लोकांपर्यंत

पोचणं इंग्रजांना परवडणारं नव्हतं म्हणून बंदी घातली. अशा गोष्टी सगळीकडेच घडत असतात.

आपल्याला चिखल चिवडायचा नाही आहे पण त्याच चिखलातून फुलणारी कमळं पाहायची आहेत. आजूबाजूला इतक्या वाईट गोष्टी घडत असताना आपण चांगल्यासाठी प्रयत्न करतोच आहोत, म्हणून राष्ट्रपुरुषांवर स्वाध्याय करायचे. त्यासाठी इतिहासाचा मागोवा घेणं हा आमचा प्रयत्न राहील. ज्या राष्ट्रपुरुषांनी मोठं कार्य केलं ते पाहणं, जाणणं, त्याचा अभ्यास करणं, ते अंगी बाणवणं हे सगळं अध्यात्मच आहे हे लक्षात ठेवा. अध्यात्म म्हणजे एका देवाच्या मागे जात राहणं एवढंच नाही तर जीवनाची मूल्ये हाही अध्यात्माचा महत्त्वाचा भाग आहे. राष्ट्रावरचं प्रेम हे जीवनमूल्य आहे. आपले पूर्वीचे नेते लोकमान्य टिळक, नेताजी सुभाषचंद्र बोस, स्वातंत्र्यवीर सावरकर सगळे आध्यात्मिक होते. सावरकर तर संस्कृत स्कॉलर होते. त्यांना समाजाविषयी विलक्षण प्रेम होतं. ज्या काळात जातीपातींचं प्राबल्य होतं त्या काळात रत्नागिरीमध्ये त्यांनी पतितपावन मंदिर बांधलं. स्थानबद्धतेच्या काळात ब्रिटिश सरकारच्या निर्बंधांमुळे त्यांना राष्ट्रकार्य करणं शक्य नव्हतं. पण त्या काळात जातिभेद नष्ट करण्याचे प्रयत्न, त्यासाठी पतित मानल्या गेलेल्या लोकांच्या पंगतीला बसून जेवणं हे क्रांतिकार्यच होतं. त्यांचं चरित्र, कार्य, त्यांनी लिहिलेलं साहित्य- त्यातला जिवंतपणा, त्यांनी सोसलेल्या यातना, आणि त्यातही दाखवलेली राष्ट्रभक्ती, निष्ठा, आपल्या कार्यावर अढळ विश्वास, हे अनुभवायला त्यांचं साहित्य वाचायला पाहिजे. असं मटेरियल पुढच्या पिढीसाठी निर्माण करणं हा या स्वाध्यायांचा हेतू आहे. भारत देश जेव्हा पारतंत्र्यात होता तेव्हा बॅरिस्टर झालेल्या सावरकरांनी पैसा, संपत्ती उपभोग हे सगळं सहज प्राप्त होण्याजोगं असूनही भारतीय जनतेच्या मानेवरचं गुलामगिरीचं जोखड फेकून देण्यासाठी क्रांतिकार्यात उडी घेतली. इंग्लंडमध्ये कैद करून जहाजाने भारतात परत आणताना मार्सेलिसच्या खाडीत शौचगृहाच्या खिडकीच्या भोकातून उडी मारण्याच्या या साहसामागे एक विलक्षण उंच उद्दिष्ट, प्रखर राष्ट्रप्रेम असल्याशिवाय हे घडणं शक्य नाही. त्यांची आध्यात्मिक प्रवृत्ती होतीच.

ईश्वरप्राप्ती करून घेणं, प्रत्यक्ष ईश्वरतत्त्वाचा अनुभव घेणं हासुद्धा मानवी जीवनाचा एक यशस्वी टप्पा आहे. त्यासाठी आम्ही प्रयत्न करतोच आहोत पण त्याला लगेच आधारभूत गोष्ट म्हणजे राष्ट्रप्रेम. माझ्या राष्ट्रावर माझं प्रेम आहे आणि त्यासाठी इतर राष्ट्रांचा मी द्वेष करेन असं अजिबात नाही. पण राष्ट्रप्रेम ही ओरिजिनल प्रेरणा आहे. स्वातंत्र्यसमरातील योद्धे त्यात आपणहून समजून उमजून पडले. त्यांना कोणी बळजबरीने त्याग वगैरे करायला लावला नव्हता. राष्ट्रप्रेमाच्या भावनेने, स्वातंत्र्याच्या जबरदस्त ओढीने, स्वतःच्या अंतःप्रेरणेने ते त्यात सामील झाले. त्यात कितीकांच्या प्राणांची आहुती पडली, कित्येकांना इंग्रजांच्या क्रौर्याला बळी पडावं लागलं. त्यांची गणतीच नाही. ते जगापुढे आलेलंच नाही. सुटाबुटात वावरणाऱ्या या तथाकथित सभ्य लोकांनी उदात्त आचारविचारच्या हिंदी जनतेवर किती अन्याय केले हे आम्ही समजून घ्यायला हवं. उदारमतवादी ही त्यांची आजची प्रतिमा पाहताना ते कधीही तसे नव्हते, आजही नाहीत. अत्यंत सामान्य पातळीवरचे ते राज्यकर्ते होते व आहेत.

आपली उन्नती करून घेताना जगाचं हे भान जरूर असायला हवं. मी अनेकदा विचार केला. आम्ही काय करू शकतो त्यासाठी? तर हायलाईटस् स्वरूपात वाङ्मय निर्मिती! तुम्ही सर्व युवकांनी हे लक्षात घ्या की स्वाध्याय करताना जे मटेरियल अभ्यासाल, जे काही वाचाल, त्यात जे प्रेरणादायी असेल, जगापुढे आलं नसेल असं काही सत्य, इतिहास- इंग्रजांचं क्रौर्य, अन्याय, खोटारडेपणा, आपल्या लोकांचं शौर्य, देशप्रेम, त्यांनी केलेले पराक्रम, अचाट शरीरसामर्थ्याची कामं, त्यामागची राष्ट्रप्रेमाची भावना, प्रेरणा- हे सगळं स्वरूपयोगकडे पाठवा. आपण ते सिस्टिमॅटिकली स्टोअर करू. त्यातून पुढच्या पिढ्यांसाठी मटेरियल तयार करू. आजवर अशा प्रकारचं प्रतिपादन आपल्याकडे केलं गेलं की आमचे लोक बुद्धिमान नव्हते, चतुर नव्हते, ढिसाळ होते, अडाणी होते पण हे खरं नव्हे. तो त्यांच्या दुर्दैवाचा भाग होता. त्यांना नीट ट्रेनिंग नव्हतं. आमच्या उदात्त सुसंस्कृत लोकांना शत्रूचा कावेबाजपणा, तोडा व फोडा ही नीती समजली नाही, त्यामुळे त्यांना बुद्धीच नव्हती असं वर्णन केलं जातं तेही ढोंगच आहे, हे जाणलं पाहिजे. उठाव करणाऱ्या शिपायांनी व जनतेने मिळून गावं-शहरं जिंकली

होती. मोठ्या प्रदेशावर त्यांनी पूर्ण कब्जा मिळवला होता. पण काही ठिकाणी प्रतिकूल परिस्थिती तर काही ठिकाणी फितुरी यांमुळे त्यांना पराभव पत्करावा लागला.

कुठेतरी एका ठिकाणी झालेलं आणि फसलेलं बंड असं त्याचं स्वरूप नव्हतंच. तो एक राष्ट्रव्यापी उठाव होता, अनेक ठिकाणी यशस्वी झालेला. त्यात अनेक नरनारी रत्ने चमकली. राणी लक्ष्मीबाई, मंगल पांडे, तात्या टोपे, अशी अनेक! तो तेजस्वी इतिहास पुढच्या पिढीसाठी इलेक्ट्रॉनिकली, डिजिटली स्टोअर केला जायला हवा.

अध्यात्माचा प्रचार हे राष्ट्रीय कार्य व राष्ट्रीय कार्य हे आध्यात्मिक कार्य आहे. अध्यात्म तर आपण करतोच आहोत. ध्यानयोग हा त्याचा गाभा आहे. त्याचं ॲनालिसिस करीत तो जास्तीत जास्त आवाक्यात कसा येईल हे तर आमचं कोअरचं काम आहे, ते आम्ही करूच. पण युवकांनी स्वाध्याय करावा, पॉझिटिव्हली त्याचं प्रेझेंटेशन करावं. मोठ्या, थोर राष्ट्रपुरुषांच्या गोष्टींचे हायलाइटस् आपण गोळा करून स्टोअर केले नाहीत तर पुढच्या पिढीला आपण काय देणार? हे सगळं विस्मृतीतच जाईल. आपण जे स्वातंत्र्य उपभोगतो आहोत त्यासाठी किती जबरदस्त किंमत या स्वातंत्र्य योद्ध्यांनी भोगली आहे हे पुढच्या पिढ्यांना कळायलाच हवं.

आपल्या संस्कृतीतली उदात्तता, उत्तुंगता दर्शवण्याऱ्या काही गोष्टी लिहायलाच हव्यात. उदा. पृथ्वीराज चौहानाने अनेकदा महंमद घोरीचा पराभव करून त्याला (तो शरण आल्यामुळे) सोडून दिलं. यासाठी 'त्याचं चुकलं, तो मूर्ख होता' असं म्हणणारेही आहेत. पण त्या काळात आपली संस्कृती खूपच विकसित होती, आणि इतर लोकच अविकसित होते. आपले आदर्श, उदात्तता, उत्तुंगता, ते समजून घेऊ शकले नाहीत. राजकीय दृष्ट्या ते चूक ठरलं पण पृथ्वीराज मूर्ख नक्कीच नव्हता. कुठलाही माणूस माणूसपणाने न वागता इतक्या हीन पातळीवर जाऊ शकतो हेच त्यांना माहिती नव्हतं, कळलं तरी पटलं नाही. कारण उदात्त संस्कारांचा प्रभाव. म्हणून हे लिटरेचर तयार व्हायला हवं. भारतात बुद्धिमान, पराक्रमी लोक पूर्वीही होते. आजही ज्या वेगाने भारताचा विकास घडतोय तो हेच सांगतोय की हा प्रवाह प्राचीन आहे. हिंदू बुद्धिमान होता-आहे, पराक्रमी होता-आहे-असेल! उदात्त, आध्यात्मिकही होता-आहे. पण जगाला समजून घेत, जगाला, त्यांच्या वृत्तींना समजून घेत यापुढे तो प्रगतीच करेल, सावध राहून. स्वतःला व उतरांनाही सांभाळेल. आणि हे केव्हा शक्य होईल, तर जेव्हा आपण इतिहासातून काही शिकू, आपला हा वारसा पुढील पिढ्यांसाठी साभाळू, त्यांच्यापर्यंत नेऊ, तेव्हाच. स्वातंत्र्यापूर्वीच्याच गोष्टी नव्हेत तर स्वातंत्र्यानंतरच्या या उत्थानाच्या काळातही जे महापुरुष होऊन गेले, जे संत, राष्ट्रपुरुष- वासुदेव बळवंत फडक्यांसारखे आद्य क्रांतिकारक- ज्यांनी मणामणांचा तुरुंगाचा लोखंडी दरवाजा स्वतःच्या ताकदीने उचकटला व तो तसाच घेऊन ते पळाले. त्यांची ताकद, लोकमान्यांची बौद्धिक संपदा, गांधीजींची अहिंसेप्रतीची अनाठायी पण प्रखर निष्ठा- अशा अनेकांनी आपल्या देशाच्या विकासाला, प्रगतीला हातभार लावला आहे. त्याची नोंद व्हायला हवी. तसा आपण स्वाध्यायातून प्रयत्न करू. प्रत्येकाने जसं जमेल तसं जरूर करावं.

## अभिनंदन



*आकाशवाणी पुणे केंद्रात जानेवारी २०१८ मध्ये गायनाच्या ऑडिशन्स घेतल्या गेल्या, ज्यामध्ये अनेकांचा सहभाग होता. त्यांमध्ये कीर्ती कुमठेकर हिला सुगम संगीताची 'बी' ग्रेड मिळाली असून ती आकाशवाणीची मान्यता प्राप्त कलाकार झाली आहे.*

*आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून प्रसारित होणाऱ्या सुगम संगीताच्या कार्यक्रमात गायन करण्याची संधी तिला मिळेल.*

**स्वरूपयोग परिवारातर्फे कीर्तीचे अभिनंदन!**

◆ वडील कै. मधुकर रामकृष्ण कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ पृष्ठप्रायोजन, एक साधिका, सोलापूर ◆

(...पृष्ठ क्र. ४ वरून)

**महाराज आपुली कथा ना कुठे निघे स्वारी?।।३।।**

अतली म्हणजे तळच नाही अशा प्रकारची स्पेस.

असे हे सावरकर. त्यांच्या देशभक्तीत बुडून जावे, की आध्यात्मिक काव्यात, हे कळत नाही. तुम्ही जर सावरकरांचं चरित्र वाचलंत आणि entire Savarkar as a personality असा अभ्यास केलात तर एकच एक गोष्ट आहे असं तुम्हाला दिसणार नाही. अनंत गोष्टींचा मिलाफ त्यात दिसेल. कुठल्या गोष्टीला दाद द्यावी हे कळत नाही. सावरकर हे महापुरुषच होते असं म्हणायला पाहिजे.

लोकमान्य टिळक, सावरकर, सुभाषचंद्र बोस या व्यक्ती सामान्य नव्हत्याच. त्यांची जीवने पाहिली तर असं वाटतं, की एका जीवनात माणूस एवढं कसं करू शकेल? जसं रामदास स्वामी, ज्ञानेश्वर महाराज, व्यास, निरनिराळे संत यांच्या बाबतीत वाटतं! इतक्या बहुविध पैलूंनी युक्त अशा सावरकरांचं चरित्र अभ्यासून आम्ही प्रेरणा घेत राहू.

**(स्वरूपयोगाश्रम येथे झालेल्या शिबिरातील स्वामींच्या निरूपणावरून)**

## महत्त्वाचे निवेदन

**येत्या तीन महिन्यांत काही अपरिहार्य कारणाने पूजनीय स्वामी माधवानंद यांचे पुण्यात आणि अन्य बाहेरगावी असलेल्या केंद्रांवर काहीही कार्यक्रम योजलेले नाहीत याची कृपया साधकांनी नोंद घ्यावी. काही कार्यक्रम योजले गेल्यास त्यासंबंधीची माहिती What's app ग्रुपवरून दिली जाईल.**

**◆ स्वरूपयोग कार्यालय खालील दिवशी बंद राहील ◆**

मंगळवार, दि. १ मे - महाराष्ट्र दिन

## अभिनंदन



नाटक हा आपल्यापैकी बहुतेक जणांच्या जिव्हाळ्याचा विषय. पाश्चात्त्य देशात तर एक विशेष अशी परंपराच आहे नाटक आणि नाट्यलेखकांची. याच दीर्घकालीन नाट्य परंपरेला अनेकानेक उत्तम नाटककारांनी त्यांच्या नाट्यलेखनाने उज्ज्वल केले. परंतु, स्त्री–नाटककार या पाश्चात्त्य नाटकांतून म्हणाव्या तितक्या पुढे आल्या नाहीत किंवा नावाजल्या गेल्या नाहीत. अमेरिकन आणि ब्रिटिश स्त्री–नाटककार विसाव्या शतकात थोड्या प्रकाशात आल्या.

पाश्चिमात्य स्त्री–नाटककार आणि त्यांनी दिलेली उल्लेखनीय नाटके, पाश्चिमात्य नाट्य क्षेत्रात स्त्री–नाटककारांचे योगदान, तत्कालीन सामाजिक बांधणी इत्यादींचा सखोल अभ्यास करून श्रद्धा जोशीने तिच्या डॉक्टरेटचा प्रबंध तयार केला आणि विशेष प्रावीण्यासह तिने डॉक्टरेट पदवी पटकावली. सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाकडून तिला नुकतीच पीएच्.डी. प्रदान करण्यात आली.

*श्रद्धाच्या प्रबंधाचे नाव होते– 'Female Mind at Work in English Drama'*

श्रद्धा ही स्वरूपयोगचे कार्यकर्ते दांपत्य सौ. सुनीता व श्री. मधुसूदन देशपांडे यांची कन्या. अगदी लहानपणापासून तिला घरातून व स्वरूपयोगाच्या केंद्रामधून, स्वामी माधवानंदांकडून अध्यात्माची प्रेरणा व शिकवण मिळत आली आहे. योग्य वयात योग्य गुरू व घरातूनही योग्य शिकवण मिळाल्याने श्रद्धाने शैक्षणिक क्षेत्रात नेहमीच उत्तुंग यश मिळवले आहे. युवा केंद्रातही ती नेहमी सक्रिय असते.

**स्वरूपयोग परिवारातर्फे श्रद्धाला हार्दिक शुभेच्छा!**

**◆ आई सौ. कुसुम मधुकर कुलकर्णी हिचे स्मरणार्थ पृष्ठप्रायोजन, एक साधिका, सोलापूर ◆**

(...पृष्ठ क्र. १३ वरून)

घडलेले स्वतःचे जीवन यांची माहिती दिली. अण्णांमुळे प्रभावित झालेल्या त्यांच्या विद्यार्थ्यांनी हा ट्रस्ट त्यांची स्मृती जतन करण्यासाठी आणि त्यांच्या गुरूंच्या आदर्शानुसार कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यासाठी स्थापन केला. श्री. कुलकर्णी म्हणाले, 'कै. अण्णा तळवलकर इलेक्ट्रॉनिक्सचे एक प्राध्यापक होते पण त्याबरोबरच एक तत्त्वज्ञ, योगी, आदर्श नेता, खिलाडू वृत्तीचा मार्गदर्शक, चित्रकार, संशोधक आणि काळाच्या पुढे पाहणारा एक शिस्तप्रिय शिक्षकही होते. त्यांचे हे सगळे गुण जिथे अनुभवाला येतात अशा व्यक्तीला हा पुरस्कार दिला जातो. स्वामी माधवानंदांसारखी व्यक्ती या पुरस्कारासाठी लाभणे हे आमचं भाग्य आहे,' असं म्हणून त्यांनी कार्यक्रमाचा समारोप केला.

## अभिप्राय

स्वरूपयोगच्या एक स्नेही गायत्री सेवक यांनी त्यांच्या शालेय काळातील शिक्षिका डॉ. पुष्पा आगाशे (गणित विषयातील डॉक्टरेट) यांना पूजनीय स्वामीजींचं गीतेच्या पाचव्या अध्यायावरील पुस्तक दिलं. त्याविषयी पुष्पाताईंनी त्यांना पाठवलेला हा अभिप्राय!

प्रिय गायत्री

स्वामी माधवानंदांचं गीतेच्या पाचव्या कर्म-संन्यासयोगाचं निरूपण करणारं पुस्तक तू मला पुण्यात असताना दिलंस. त्यानंतर महिन्याभराने मी अमेरिकेत आले आणि ते वाचण्याची प्रेरणा मिळाली. Surprisingly एकदा वाचायला सुरुवात केल्यावर मला ते हातातून खाली ठेवावंसं वाटलं नाही.

आत्तापर्यंत गीतेवरची १० तरी पुस्तकं मी वाचली असतील. पण या पुस्तकाचं 'कर्म-ज्ञानयोग' हे title बघून पुस्तकातलं लिखाण खास वेगळं असावं असं मला वाटलं. प्रत्येक श्लोकाचा अर्थ इतका स्पष्ट आणि सुलभ आहे की वाचताना पुढे पुढे वाचत जावं असं वाटतं. पहिल्या श्लोकापासून शेवटच्या श्लोकापर्यंत विचारांचा प्रवाहीपणा आहे- continuity आहे. ती मला भावली. Effortlessly फुलांचे गजरे किंवा हार करतात तसं वाटलं. प्रत्येक शब्दाच्या अर्थाचं उकलन सुंदर वाटलं. भावार्थ गीता, ज्ञानेश्वरी यांचे संदर्भ, रामदास, तुकाराम, चिन्मयानंद, श्रीरामकृष्ण, विवेकानंद, पांडुरंगशास्त्री इत्यादी अनेक सत्पुरुषांच्या विचारांची गुंफण आनंददायी आहे. साध्या साध्या उदाहरणांमधूनही वाचन सुलभ वाटलं.

श्रीमाधवानंदांना माझे शतशः प्रणाम!

पुष्पा आगाशे

## egranthalay.com





स्वरूपयोग पुणे युवा केंद्रातील देवयानी मांडवगणे (स्वरूपयोग वार्तापत्राच्या सहसंपादिका रोहिणी मांडवगणे यांची कन्या) आणि स्वामी माधवनाथांचा अनुग्रहीत युवा साधक सारंग नेर्लेकर या दोघांचा egranthalay हा नवीन उपक्रम विजयादशमी ३० सप्टेंबर २०१७ या शुभमुहूर्तावर सुरू झाला आहे.

भारत ही जगाची आध्यात्मिक राजधानी आहे असे म्हटले जाते. भारतीय तत्त्वज्ञान आणि प्राचीन साहित्य जगभर most authentic formमध्ये पोहोचणे गरजेचे आहे. वाङ्मयातील प्रदूषण समाजमनावर कमीत कमी परिणाम कसं करेल याची जबाबदारी एक भारतीय म्हणून वाटत असल्यामुळे त्यांनी हा उपक्रम सुरू केला आहे.

सतत advance होत असलेले जग हे individual progressला contribute करत आहे, की आपला attention span आणखी कमी करून सर्वांगीण (holistic) उन्नतीपासून दूर नेत आहे, हा महत्त्वाचा प्रश्न पडायला हवा. Ebooks, kindle, free pdfच्या काळात old school पद्धत जिवंत ठेवण्याची गरज आहे. पुस्तके, ग्रंथ hard copy booksच्या माध्यमातून, वाचनाची सवय नसलेल्यांपर्यंत साहित्य नेणे, त्यांच्यात आवड निर्माण करणे आणि आवड असलेल्यांची ती वाढविणे हे या दोघांचे ध्येय आहे.

वैदिक वाङ्मयापासून ते ललित साहित्यापर्यंत सर्व प्रकारचे साहित्य, एकाच छत्राखाली, तंत्रज्ञानाद्वारे संपूर्ण भारतात तसेच जगभरात घरपोच पोहचविण्यासाठी **egranthalay.com**ची निर्मिती त्यांनी केली आहे.

धार्मिक व आध्यात्मिक ग्रंथ, चरित्रे, संतसाहित्य, योग, आयुर्वेद, पौरोहित्य, ज्योतिष, संस्कृत व इतर अनेक विषयांवरील, अनेक भाषांमधील पुस्तके व दुर्मीळ ग्रंथ जतन करून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम egranthalay करत आहे.

हा उपक्रम आता पूर्णपणे कार्यवाहीत झाला आहे. स्वरूपयोगच्या सर्व साधकांनी त्याचा अवश्य लाभ घ्यावा.

**Website - www.egranthalay.com**


• वडील कै. पांडुरंग महादेव संत यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ (३१ मार्च) - पुण्याच्या एका साधिकेकडून •

# श्रीरामनवमी उत्सव - स्वरूपयोगाश्रम, गिरिवन





'राम' पहावा। 'राम' गावा।
'राम' भजावा। 'राम' ध्यावा।
सर्वकाळी सर्वस्थळी। 'श्रीराम'च असे हृदयांतरी।





मन 'रामनामी' रंगले!















'स्वरूपयोग'चे साधक शिलेदार




**If Undelivered Please Return To:**

## स्वरूपयोग प्रतिष्ठान

८८५/३, शिवाजीनगर, भांडारकर रोड, गल्ली क्र. ६, पुणे-४११ ००४,

दूरध्वनी : ०२० २५६५२४५७

ई-मेल: swaroopyogvp@gmail.com । वेबसाईट: www.swaroopyog.net



**Registered with Registrar of Newspapers for India, New Delhi Under**
**No. MAH-MAR-70780/99 dated 24-5-99**